बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)




बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ३० | बुधवार,दि.३० जून २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021

## पोटनिवडणुका स्थगितीसाठी सरकारची सर्वोच्च न्यायालयात याचिका




**मुंबई :** राज्यातील पाच जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांमधील ओबीसी आरक्षण रद्द केल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या पोटनिवडणुका करोना साथरोगाच्या प्रादुर्भावाचा धोका लक्षात घेऊन सहा महिन्यांसाठी स्थगित कराव्यात, अशी विनंती करणारी याचिका सोमवारी राज्य सरकारच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द केले आहे. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली आणि ओबीसींची सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण सिद्ध करणारी अनुभवसिद्ध माहिती ( इंपेरिकल डाटा) सादर न केल्याच्या कारणावरून हे आरक्षण रद्द करण्यात आले.

न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य निवडणूक आयोगाने नागपूर, अकोला, वाशिम, धुळे व नंदूरबार या पाच जिल्हा परिषदांमधील तसेच त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांमधील ओबीसी आरक्षण रद्द करून त्या जागांवर पोटनिवडणुका घेण्याचे जाहीर केले. या जागा खुल्या प्रवर्गातून भरल्या जाणार आहेत. त्यामुळे ओबीसी समाजात असंतोष पसरला आहे.

ओबीसींचे राजकीय आरक्षण पुनर्प्रस्थापित करण्यासाठी या वर्गाचे मागासलेपण सिद्ध करणे आवश्यक आहे. ही संपूर्ण माहिती केंद्र सरकारकडे असल्याचे राज्य सरकारचे मत आहे. परंतु ती केंद्र सरकारकडून मिळत नाही, अशी ओबीसी नेत्यांची व सरकारमधील मंत्र्यांची तक्रार आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रश्नावर चर्चा होऊन, सध्याची करोनाचा परस्थिती पाहता, निवडणुका घेणे धोक्याचे आहे, त्यामुळे त्या पुढे ढकलाव्यात, अशी राज्य निवडणूक आयोगाला विनंती करण्याचे ठरले. त्यानुसार राज्याचे मुख्य सचिव सीताराम कुंटे यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठविले. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या पोटनिवडणुका घेण्यात येत आहेत, असे सांगून त्या स्थगित करण्यास आयोगाने नकार दिला.

राज्य सरकारने आता ओबीसी आरक्षण रद्द केल्यामुळे नागपूर, अकोला, वाशिम, धुळे व नंदूरबार या पाच जिल्हा परिषदांच्या व त्यांतील पंचातय समित्यांच्या पोटनिवडणुकांना करोनाची परिस्थिती लक्षात घेऊन सहा महिन्यांसाठी स्थगिती द्यावी, अशी विनंती करणारी याचिका दाखल केली आहे. ग्रामविकास विभागाने ही याचिका दाखल केली आहे, असे सूत्राने सांगितले.

## बनावट नोटामागे नक्षलवाद्यांचे कनेक्शन ?

### ८ कोटीच्या बनावट नोट प्रकरणात दोन आरोपी गोंदिया जिल्ह्यातील





**गोंदिया :** बनावट नोटांचा काळाबाजार करणाऱ्या ८ जणांना गोंदिया व बालाघाट पोलिसांनी संयुक्त कामगिरी करीत रविवारी (दि.२७) अटक केली आहे. यामध्ये त्यांच्याकडून पाच कोटी रूपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये ६ आरोपी बालाघाट येथील तर २ आरोपी गोंदिया येथील आहेत. यावरून पोलिसांनी नक्षली कनेक्शन असल्याचा संशय व्यक्त केला आहे.

बालाघाटचे पोलीस अधीक्षक अभिषेक तिवारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बैहर व बालाघाट येथे बनावट नोट चालविल्या जात असल्याच्या तक्रारी येत होत्या. यावर मागील २ दिवसांपासून बैहर पोलिसांसोबत ऑपरेशन राबविले जात होते. अशात बालाघाट येथून राहुल घनश्याम मेश्राम (२५), अनंतराम जंगली पांचे (३८), हरिराम रामेश्वर पांचे (३३), नन्हूलाल किशन विश्वकर्मा (४०), हेमंत आत्माराम उके (४०, सर्व रा.किरनापूर),सोहनलाल भजनलाल बिसेन(रा.सेवती) यांना आठ लाख रूपयांच्या बनावट नोटांसह पकडण्यात आले.

विचारपूस केली असता त्यांनी गोंदिया जिल्ह्यातून बनावट नोटांचा पुरवठा होत असल्याचे सांगीतले. यानंतर बालाघाट पोलिसांनी गोंदिया पोलिसांच्या मदतीने डुग्गीपार पोलीस ठाणेंतर्गत येत असलेल्या कनेरी येथील मुकरू उर्फ मुकेश वकटू तवाडे (३०) व गोरेगाव पोलीस ठाणेंतर्गत येत असलेल्या घुमर्रा येथील रामू उर्फ रामेश्वर रंगलाल मौजे (४०) यांना अटक केली आहे. त्यांना या बनावट नोटा कोठून व कधीपासून पुरवठा होत आहे याबाबत विचारणा सुरूआहे.

विशेष म्हणजे, मार्च महिन्यात बैहर पोलीस ठाण्यांतर्गत मुक्की रोडवरील बाम्हणी चौकात पोलिसांनी बनावट नोट चालविण्याच्या प्रयत्नात असलेल्या ४ जणांना अटक केली होती. पोलीस अधीक्षक तिवारी यांच्यानुसार या प्रकरणाशी त्यांची लिंक असून ही एकच टोळी असल्याची शक्यता व्यक्त केली आहे.

**दहा रुपयांपासून २ हजार रुपयापर्यंतची नोट**

**जप्त करण्यात आलेल्या नोटांमध्ये १० रूपयांपासून दोन हजार रूपयांपर्यतच्या नोटांचा समावेश आहे. त्यात दोन हजार रूपयांच्या नोटा जास्त असून एवढ्या मोठ्या प्रमाणात नोटा बनविण्यासाठी स्कॅनर व कलर प्रिंटर वा अन्य कोणत्या मशिनचा वापर केला जात आहे याचा तपास पोलीस करीत आहे. बनावट नोटांचा कारभार किरनापूर व गोंदिया जिल्ह्याशी जुळलेला असल्याची माहिती असल्याने पोलिसांचे वेगवेगळे पथक त्या दिशेने टोळीच्या मुख्य आरोपीच्या शोधात कार्यरत आहे.**

**जगदलपूर येथे मिळाले होते ७.९ कोटींच्या बनावट नोटा**

**बालाघाट येथून सुमारे ४०० किलोमीटर अंतरावर छत्तीसगड राज्यातील जगदलपूर येथे ३ मार्च रोजी सात कोटी ९० लाख रूपयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या होत्या. या नोटा जगदलपूर येथून विशाखापट्टनम येथे पोहचविल्या जात होत्या. ओडिसा पोलिसांनी तपासणी दरम्यान एका फोर्ड कारमधून चार ट्रॉली बॅगसोबत ३ जणांना अटक केली होती. बॅगमध्ये ५०० रूपयांच्या नोटांसह १५८० बंडल होते. त्यानंतर ११ मार्च रोजी बैहर येथे चार लाख रूपयांपेक्षा जास्तीच्या बनावट नोटा पोलिसांनी जप्त केल्या होत्या.**

## भाजपचे आंदोलन म्हणजे पुतनामावशीचे प्रेम : कवाडे



**गोंदिया:** ओबीसी समाजाला न्याय देण्यासाठी आपण व अनेक संघटनांनी संघर्ष केले. माजी पंतप्रधान व्ही.पी.सिंग सरकारने ओबीसीला न्याय दिला. दरम्यान या काळात याच भाजपाने ओबीसी आरक्षणाचा विरोध केला होता. परिणामी व्ही.पी.सिंग सरकाराला जावे लागले. मात्र त्याच भाजपला आता ओबीसी समाजाचा प्रेम उफाळून आला आहे. फडणविस सरकाराने गेल्या ५ वर्ष ओबीसी समाजासाठी काही केले नाही. म्हणून भाजपचे आंदोलन म्हणजेचे पुतना-मावशीचे प्रेम आहे, असा आरोपी पिरिपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जोंगेंद्र कवाडे यांनी केला आहे.

पिरिपाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाडे हे (ता.२८) पक्षांतर्गत बैठकीसाठी गोंदिया आले होते. दरम्यान प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधतांना ते बोलत होते. प्रा. कवाडे पुढे म्हणाले, सर्वोच्च न्यायालयापुढे ओबीसी समाज बांधवांची जनसंख्या मांडण्यात आली नाही. यामुळे न्यायालयाच्या आदेशाने ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण रद्द झाले आहे. याला आमच्या मित्र पक्षाची महाविकास आघाडी जेवढी जबाबदार आहे, तेवढीच जबाबदार मागील फडणवीस सरकार देखील आहे. ज्या ओबीसींच्या आरक्षणाचे आजपर्यंत ज्यांनी विरोध केला, तेच आता रस्त्यावर उतरून आंदोलनाचा सोंग करीत आहे,

एवढेच नव्हेतर भाजपचे नेते फडणवीस यांना आजही सत्तामोह आहे, त्यामुळेच ते माज्या हाती सत्ता आली तर ओबीसींचे आरक्षण पुर्ववत करण्याची भाषा करीत आहेत हे आता ओबीसी समाज पचवून घेणार नाही.

ओबीसींचे राजकीय आरक्षण पुर्ववत करण्यात यावे तसेच महाविकास आघाडी सरकारनेही घेतलेला ओबीसी समाजाचा प्रशासकीय पदोन्नतीचा निर्णय मागे घेण्यात यावा या शिवाय देशात वाढती महागाई या सर्व प्रश्नांवर पिरिपा आगामी काळात आक्रामक भूमिका घेणार आहे, याकरिता नाशिक येथे पिरिपाची प्रादेशिक परिषद येत्या १७ जुलै रोजी आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीत मुंबई व दिल्ली येथील आंदोलनाची रुपरेखा निश्चित केली जाणार आहे. ओबीसी समाजाचे आरक्षण पुर्ववत करण्यात यावे, तो शासन निर्णय मागे घेण्यात यावा, महागाई कमी करण्यात यावी, अशी आमची प्रमुख मागणी राहणार आहे. केंद्र सरकारावर ताशेर ओढतांना ते म्हणाले मोदी सरकाराचा ७ वर्षाचा कार्यकाळ म्हणजे अघोषित आणीबाणी सारखा आहे.

माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या सरकारातील आणीबाणी तर सर्व सामान्यांच्या हिताची होती पण मोदी सरकाराची अघोषित आणीबाणी ही गरिबांना अडचणीत आणणारी आहे. यासाठी देखील भाजपने आंदोलन करावे, असाही टोला लगावला.

यावेळी त्यांच्या सोबत जिल्हा अध्यक्ष राजकुमार भेलावे, महेंद्र नागदेवे, रामटेके, रियाज भाई, सुनिल भालाधरे, जय मेश्राम, नागेश बडगे, लाला प्रजापती, सुरेश सतदेवे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## डेल्टा प्लस कोविड विषाणूच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सावधानी बाळगावी- जिल्हाधिकारी खवले



**गोंदिया-** कोरोनाचे संकट अद्याप टळलेले नाही. आता डेल्टा व डेल्टा प्लस कोविड विषाणूच्या नव्या प्रकारामुळे प्रादुर्भावाचे संकेत दर्शविण्यात येत असल्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी अधिक सावधानी बाळगून मास्क वापरणे, सुरक्षित अंतर ठेवणे व हात वारंवार स्वच्छ करणे या त्रिसुत्री कार्यक्रमामुळे तसेच शासनाने वळोवेळी निर्गमीत केलेल्या कोविड-१९ च्या मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन कोरोनावर मात करणे शक्य आहे, असे आवाहन जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी डेल्टा व डेल्टा प्लस या नविन विषाणूच्या संभाव्य धोका असलेल्या पुर्वतयारी निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत केले.

महाराष्ट्रामध्ये कोविड-१९ चा नविन प्रकार डेल्टा व डेल्टा प्लसचे बाधित रुग्ण रत्नागिरी, जळगाव, ठाणे,पालघर, मुंबई व सिंधुदुर्ग जिल्ह्यात आढळलेले आहे. या नविन विषाणूमध्ये संसर्गाची वाढीव क्षमता आहे. डेल्टा व

डेल्टा प्लस हा नविन विषाणू फुफुसाच्या अवयवास जास्त आकर्षण करते. सदर विषाणूचा चेपेलश्रेपरश्र रपींळलेवू या औषधोपचाराला कमी प्रतिसाद आहे.

डेल्टा व डेल्टा प्लस हा नविन कोविड विषाणू प्रथम मार्च २०२१ मध्ये युरोप देशाच्या तिस?या लाटेत आढळला. सध्या भारत व्यतिरिक्त अमेरिका, लंडन, पोर्तुगाल, स्विझरलँड, जपान, पोलँड, नेपाल, चीन व रशिया या देशात डेल्टा व डेल्टा प्लस हा नविन कोविड विषाणू आढळला आहे. या कोविड विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची

शक्यता आयसीएमआर व इतर राष्ट्रीय पातळीच्या आरोग्य संस्थांनी तिसऱ्या लाटेच्या स्वरुपात येण्याची शक्यता वर्तविली आहे.

सध्या गोंदिया जिल्ह्याचा समावेश लेवल १ मध्ये असल्याने वेळेत बदल करुन काही निर्बंध लावण्यात आलेले आहेत. अत्यावश्यक सेवा वगळून इतर सर्वप्रकारची आस्थापने, दुकाने, व्यवसाय यांना सोमवार ते शुक्रवार सायंकाळी ४ वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. तसेच गोंदिया जिल्ह्यामध्ये येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या लक्षात घेता डेल्टा व

डेल्टा प्लस हा नविन कोविड विषाणू गोंदिया जिल्ह्यात दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील सर्वप्रकारच्या बाजारपेठ यांना वेळेचे बंधन घालण्यात आले आहे. सर्व सामाजिक व राजकीय समारंभास व लोकांच्या जमावास मर्यादेचे निर्बंध लावण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांचे लवकरात लवकर लसीकरण करावे, अपींळसशप व ठढ-झउठ चाचणीची संख्या वाढवावी, नागरिकांमध्ये कोरोनाबाबत जनजागृती करावी,आरोग्य यंत्रणा व आवश्यक साहित्याची पुरेशी व्यवस्था ठेवावी. उपचाराकरीता लागणा?या आवश्यक औषधांचा मुबलक साठा ठेवावा. असे निर्देश जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी आरोग्य विभागाला दिले.बैठकीस शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.नरेश तिरपुडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन कापसे उपस्थित होते.

## मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज ऑनलाईन सादर करा

**भंडारा:** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. महाडीबीटी संगणकीय प्रणालीवर २०२०-२१ या शैक्षणिक सत्रासाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज ३ डिसेंबर २०२० पासून ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया सुरू झाली असून अनुसूचित जाती, इमाव, विमाप्र व विजाभज प्रवर्गातील २०२०-२१ या सत्राकरिता एकूण ३७ हजार ६९ अर्ज भरलेले असून महाविद्यालयाने ३४ हजार २२५ अर्ज मंजूरीसाठी कार्यालयाकडे सादर केलेले आहेत. तसेच सध्यस्थितीनुसार १ हजार २०३ अर्ज अद्यापही महाविद्यालय स्तरावर प्रलंबित दिसून येत आहे. शासनामार्फत ३० जून २०२१ ही अंतिम दिनांक देण्यात आली आहे

## स्टुडंट्स राईट्स असोसिएशनच्यावतीने विद्यार्थ्यांच्या मागण्यांना घेऊन आंदोलन



**नागपूरः-** राज्य लोकसेवा आयोगाच्या सर्व रखडलेल्या परीक्षा, रखडलेल्या नियुक्त्या,मेगाभारती, पोलीस भरती,व सरळसेवा भरती लवकरात लवकर घेण्याच्या मागणीला घेऊन स्टुडंट्स राईट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष उमेश कोरराम यांच्या नेतृत्वात मंगळवारला नागपूरच्या सविंधान चौकात आंदोलन करुन शासनाचे लक्ष वेधण्यात आले.आंदोलनानंतर जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले.त्या निवेदनात चझडउ राज्य लोकसेवा आयोगाची सदस्य संख्या ६ असायला पाहिजे परंतु मागील ३ वर्षांपासून दोनच सदस्य चझडउ चा डोलारा सांभाळत आहेत. येत्या १० दिवसात संपुर्ण सदस्य भरले जावे. MPSC आणि महाआईटी च्या रखडलेल्या सर्व परीक्षा लवकर घ्याव्यात व अंतिम निकाल लावावे. स्थापत्य अभियांत्रिकी सेवा परीक्षेच्या ३६०० विद्यार्थ्यांच्या मुलाखती लवकरात लवकर घ्यावे.रखडलेल्या ४१३ अधिकाऱ्यांना नियुक्त्या द्यावे.राज्य सरकारच्या वर्ग ३ व ४ च्या सर्व परीक्षा खाजगी कंपनीकडून न घेता, MPSC माफ'तच घ्याव्यात.तसेच कंत्राटी पद्धत रद्द करून पूर्णवेळ नोकऱ्या द्यावे.मागील ३ वर्षांपासून पोलीस भरती झालीच नाही. येत्या १० दिवसात पोलीस भरतीची अधिसूचना जारी करावी.येत्या १० दिवसात सरळसेवा व मेगाभारती साठी अधिसूचना जारी करावी.कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्याचे दोन वर्षे फुकट गेले त्यामुळे काही विद्यार्थ्यांचे वयोमर्यादा संपू शकते त्यासाठी वयोमर्यादेत २ वर्षाची वाढ करावी व लवकर यासंबंधीचा शासन आदेश काढावे.फ्म हाआईटीफ या सरकारी कंपनी वर SIT लावावी व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावे या मागण्यासह इतर मागण्यांचा समावेश होता.सदर गण्या मान्य न झाल्यास येत्या १० दिवसात महाराष्ट्रभर हजारो विद्यार्थ्यांचा मोठा आक्रोश मोर्चा काढण्याचा इशारा देण्यात आला आहे.आंदोलनात नितेश कराळे,मुकुंद अडेवार, दीनानाथ वाघमारे ,पंकज सावरबांधे, सुरज गाजजलवार ,बाबू राठोड, रणदिवे सर,रितेश बावनकर,वैभव बावनकर,प्रतीक बावनकर, आणि विद्याथी वर्ग या धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.



## मानधनाअभावी गृहनिर्माण अभियंत्यांवर उपासमारीची वेळ

**अर्जुनी मोरगाव:** गावातील सर्वसामान्य जनतेला राहण्यासाठी हक्काचा निवारा मिळावा यासाठी शासनाच्या विविध योजनांमधून घरकूल तयार करून दिले जात आहे. मात्र लाभार्थ्यांच्या घरकुलाचे निर्माणाधीन काम करणारे ग्रामीण गृहनिर्माण अभियंते मागील दीड वर्षापासून मिळणाऱ्या अल्पशः मानधनापासून वंचित असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. घरकूल लाभार्थ्यांच्या बांधकामावर देखरेख ठेवणारे ग्रामीण गृहनिर्माण अभियंते पंचायत समिती अंतर्गत कार्यरत आहेत. या अभियंत्याची नियुक्ती एनजीओ संस्थेमार्फत करण्यात आली आहे. त्यांना घरकूल बांधकामानुसार मानधन दिला जात असल्याचे सांगण्यात येते.

सद्या स्थितीत अर्जुनी मोर पंचायत समितीमध्ये १० प्रमाणे जिल्ह्यात ८० ग्रामीण गृहनिर्माण अभियंते बाह्य खाजगी यंत्रणेकडून कार्यरत आहेत. त्यांच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे ग्रामीण भागातील सामान्य जनतेच्या घरकुलांचे स्वप्न पूर्ण केले जाते.

घरकुलासाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांस घरकुलाचे आवश्यक दस्तऐवजांसह फाईल, लेआऊट, टप्याटप्यांनी काढण्यात येणारे बांधकामाचे देयके, बांधकाम सुरु असताना वेळोवेळी दिली जाणारी गृहभेट एकंदरीत घरकूल बांधकामाचे संपूर्ण नियंत्रण ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्याचे असते. एका घरकुलाचा मेहनताना पायवा बांधकाम, सज्जापर्यंत, पूर्ण छत, शौचालयासह घरकुलाचे पूर्ण बांधकाम झाल्यावर अशा ४ टप्यात मिळणे आवश्यक आहे. नोव्हेंबर २०१९ पासून ते आतापर्यंत ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना मानधन मिळाले नसल्याची ओरड आहे. गावखेड्यातील लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण करणारे, वेळोवेळी गृहभेट देऊन बांधकामाचे निरीक्षण करुन लाभार्थ्यांना बांधकाम सबंधी मार्गदर्शन करणाऱ्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना गृहभेटीचा प्रवास भत्ता सुध्दा मिळत नसल्याची माहिती आहे. मागील दीड वर्षांपासून मानधन मिळाले नसल्याने सबंधित गृहनिर्माण अभियंत्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

## राज्य वन्यजीव कृती आराखडा अंतिम मंजुरीसाठी राज्य शासनाकडे



**नागपूर :** राज्यातील व्याघ्रप्रकल्पांसाठी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना आहेत, पण व्याघ्र प्रकल्पाव्यतिरिक्त इतर जंगलातील वन्यजीवांसाठी अशा कोणत्याही मार्गदर्शक सूचना नव्हत्या. राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्यांनी मंडळाच्या बैठकीत केंद्राच्या धर्तीवर राज्याचा वन्यजीव कृती आराखडा तयार करण्याची मागणी केली होती. हा आराखडा आता तयार झाला असून राज्य शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे.

सुरुवातीला तो इंग्रजीत आणि त्यानंतर मराठीत तयार करण्यात येईल. २०२१ ते २०३१ अशा दहा वर्षांसाठी आराखडा असून तीन वर्षे, पाच वर्षे आणि दहा वर्षे अशा तीन टप्प्यात तो राबवला जाणार आहे. राज्य वन्यजीव कृती आराखडा हा वन्यजीव संवर्धन, वन्यजीव संरक्षण आणि जनजागृतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विविध विषयातील तज्ज्ञांद्वारे या कृती आराखडयाचे प्रारूप तयार करण्यात आले.

बारा विषयांसाठी बारा समित्या आणि त्या प्रत्येक समितीत त्या विषयातील तज्ज्ञ तसेच वनखात्याचा एक अधिकारी समन्वयक म्हणून नेमण्यात आला. महाराष्ट्रातील संपूर्ण वन्यजीवांच्या व्यवस्थापनाच्या अनुषंगाने हे एक सर्वागपूर्ण व एकछत्री मार्गदर्शक दस्ताऐवज असेल. राज्यात वन्यप्राणी संरक्षण व संवर्धनासंदर्भात अनेक आव्हाने आहेत.

वन्यप्राण्यांचे अधिवास, भ्रमणमार्ग संरक्षणाकरितासुद्धा विकासकामामुळे अडथळा निर्माण होत आहे. खाद्याची कमतरता आणि वनालगतचे गावकरी यांची जंगलावरची निर्भरता आदी अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. राज्यात जैवविविधतेच्या प्रमाणात संरक्षण व संवर्धन तसेच व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही विविधतेची गरज आहे. वन्यजीव विभागामध्ये काळानुरूप बदल आवश्यक आहे.

वन्यजीवांचे योग्य व्यवस्थापन होण्याच्या दृष्टीने व्यापक नियोजन आवश्यक आहे. राज्यात घोषित करण्यात आलेले संरक्षित क्षेत्र, एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या तुलनेत तीन टक्केच आहे. अजूनही पाच टक्के अधिक उद्दिष्ट गाठण्याचे लक्ष्य गाठता आलेले नाही. यातूनच मानव-वन्यजीव संघर्ष शिगेला पोहोचला आहे. आधुनिकता आत्मसात करून कर्मचारी आणि अधिकारी यांना आवश्यक वन्यजीव प्रशिक्षण, अधिवास व्यवस्थापन आदी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध असली पाहिजे. तरच भविष्यातील आव्हानांना सामोरे जाणे शक्य होणार आहे. त्यादृष्टीनेच हा आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड?ाला आता राज्यशासनाच्या मंजुरीची प्रतीक्षा आहे, असे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नितीन काकोडकर यांनी सांगितले.

**बारा विषयांची निवड**

**राज्य वन्यजीव कृती आराखडयासाठी बारा विषयांची निवड करण्यात आली. यात प्रामुख्याने धोकाग्रस्त प्रजातीचे संवर्धन, वन्यजीवांचा अवैध व्यापार, मानव-वन्यजीव संघर्ष व बचाव, वन्यजीवांचे आरोग्य व्यवस्थापन, जलीय परिसंस्था संवर्धन, सागरी किनारपट्टी व सागरी जैवविविधता संवर्धन, वन्यजीव पर्यटन व्यवस्थापन व जनजागृती, वन्यजीव संवर्धनात लोकसहभाग, वन्यजीव संशोधनासाठी सबलीकरण, वन्यजीव क्षेत्र व कृती आराखडयानुसार काम करण्यासाठी निधीची उपलब्धता आणि तसे जाळे तयार करणे आदी बारा विषयांचा समावेश आहे.**

## जिल्ह्यात ४०,३८१ रुग्णांची कोरोनावर मात

**गोंदिया,:** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून आज २९ जून रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवे ०२ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले. ५ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांनी औषधोपचारातून कोरोनावर मात केल्याने त्यांना आज सुट्टी देण्यात आली. जिल्ह्यातील कोरोना बाधित एका रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. आजपर्यंत ४१,१२२ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. ४०,३८१ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या ४१ आहे. २५ क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ५७४ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९८.२ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.३९ टक्के आहे तर डब्लिंग रेट ४३९.७ दिवस आहे.

गोंदियाच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेत कोरोना

विषाणूच्या तपासणीसाठी आतापर्यंत १९४२५२ नमुने पाठविण्यात आले. यामध्ये १६८९७८ नमुने निगेटिव्ह आले तर २१४५७ नमुने पॉझिटिव्ह आले. २०८ नमुन्यांचा अहवाल प्रलंबीत आहे. रॅपिड अँटीजेन चाचणीतून आतापर्यंत २१६७२२ व्यक्तींचे नमुने घेण्यात आले. यामध्ये १९५७६७ व्यक्तींचे अहवाल निगेटिव्ह आले तर २०९५५ व्यक्तींचे अहवाल पॉझिटिव्ह आढळले. कोरोना वॉर रूममधून बाधित रुग्णांसाठी २४ तास सेवा उपलब्ध आहे. ज्या रूणांना काही समस्या असल्यास त्यांनी ८३०८८१६६६६ आणि ८३०८८२६६६६ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

## संपादकीय

### सामाजिक न्याय दिवस कशासाठी?

राज्य शासनाकडून २६ जून हा दिवस सामाजिक न्याय दिवस म्हणून जाहीर झालेला आहे. राजर्षी शाहू महाराजांचा हा जन्म दिवस. सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यासाठी त्यांचं कार्य खूप महत्त्वाचे आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, राजकीय, आर्थिक आणि सामाजिक हक्क. स्त्री-पुरुष समानता, समाजातील सर्वच थरातील व्यक्तींना विकासाची, शिक्षणाची संधी, ही सामाजिक न्यायाची उद्दिष्टे आहेत.

सामाजिक न्याय म्हणजे काय? तर प्रत्येक व्यक्तीला त्याच्या क्षमतेप्रमाणे विकासाच्या संधी देणे, अथवा मिळवून देणे. कोणाचेही शोषण होणार नाही. किमान प्राथमिक गरजा पूर्ण होतील हे बघणे. आर्थिक सत्ता केंद्रित होणार नाही, ही दक्षता घेणे. समाजातील, आर्थिक, दुर्बल घटकांना सुरक्षितता वाटेल, असे वातावरण असणे, हीच सामाजिक न्यायाची संकल्पना आहे.

सामाजिक न्याय दोन प्रकारचे असतात. पहिला औपचारिक न्याय. दुसरा अनौपचारिक न्याय. पहिल्या औपचारिक न्यायात न्यायसंस्था, कायदेशीर तरतुदीनुसार दोषी व्यक्तीला शिक्षा केली जाते. अशा न्यायाचे स्वरूप कायदेशीर, गुन्हेगार शास्त्राशी संबंधित असते. दुसरा जो अनौपचारिक न्याय आहे, चांगल्या, वाईटाचा विचार, माणुसकीचा विचार यात असतो. कोणावर अन्याय होणार नाही, हा समतेचा विचार यात असतो.

या व्यतिरिक्त एखाद्या समाजाला एखाद्या गोष्टीसंदर्भात योग्य न्याय मिळाला का? मिळतोय काय? अन्न, वस्त्र, निवारा, मतदान, आरोग्य, शिक्षण मिळतेय का? वंचितांना न्याय मिळतोय का? वंश, जात, धर्म, विचार करता सर्वांना संधी मिळते का? गरीब-निराधारांचा विचार करून त्यांना प्रवाहात बरोबर आणणे, हा संपूर्ण विचार सामाजिक न्याय या संकल्पनेतून मोडतो.

छत्रपती रा. शाहू महाराजांनी समाजातील तळागाळातल्या लोकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे महत्त्वाचे कार्य केले. ते रयतेचे राजे म्हणूनच ओळखले जातात. महाराजांनी पुनर्विवाह कायद्याला मान्यता दिली. कोणत्याही वर्गासाठी ते कोणतेही द्वेष मनात नव्हते. माणसाला माणूस समजण्यात येणार नाही, तोपर्यंत विकास होणार नाही, असे मत त्यांचे होते. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा शिष्यवृत्ती घेऊन परदेशात शिक्षणासाठी गेले होते, पण शिष्यवृत्ती संपल्यामुळे त्यांना परत यावे लागले. महाराजांना ही गोष्ट समजल्यावर ते स्वतः मुंबईत गेले आणि त्यांनी आंबेडकर यांना पुढील अभ्यास सुरू ठेवायला मदत केली. शोषित, मागासवर्गीयांना आंबेडकर यांच्या रूपात नेता मिळाल्याचे शाहू महाराजांनी जाहीर केले होते.

राज्य शासनाच्या वतीने २६ जून हा त्यांचा जन्मदिवस ङ्गसामाजिक न्याय दिवसफ म्हणून साजरा केला जातो. कानाकोपऱ्यातल्या महाराष्ट्राकडे बघितले तर काय चित्र आहे? अनेक पाडे, वस्त्या, समाज असा आहे, जो अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य व्यवस्था या मूलभूत गरजांपासून वंचित आहे. त्यांना योग्य तो न्याय मिळत नाही. मुलांना शिक्षण मिळू शकत नाही. आरोग्यव्यवस्था नाही. आदिवासींच्या समस्या, प्रश्न आहेत. हुंडाबळी, लैंगिक शोषण, बलात्कार हे स्त्रियांचे प्रश्न आहेत. बालकांच्या कुपोषणाचे प्रश्न आहेत. बालकामगारांची समस्या आहे. असंघटित कामगार, स्त्रिया यांना काम देत असतानाच मानवतेच्या भावनेतून दिले जाते का? अन्याय होत नाही ना? हा विचारही सामाजिक न्याय दिवस साजरा करताना महत्त्वाचा आहे.

आजची परिस्थिती लक्षात घेता "सामाजिक न्याय' हा दिवस साजरा करताना त्या दृष्टीने खरोखरच न्याय दिला जातोय का? हे पाहणेही महत्त्वाचे ठरणार आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांचे कार्य डोळ्यांसमोर ठेवून वाटचाल होणे महत्त्वाचे आहे आणि तेच हा दिवस साजरा करण्याचे फलित ठरेल.

# मराठा-ओबीसी आरक्षण आणि नवा राजकीय संघर्ष

कुणी हो म्हणा, नाही म्हणा पण मराठा आणि ओबीसी आरक्षण हा अंतर्गत राजकीय संघर्षाचा अनिवार्य भाग झाला आहे. यात 'आधी.. संख्येएवढं ओबीसी आरक्षण आणि नंतर मराठा आरक्षण..' अशी निखळ प्रामाणिक भूमिका जर मराठा नेत्यांनी घेतली, तर संघर्षा ऐवजी समन्वय निर्माण होईल, यात संशय नाही. त्यासाठी ओबीसींची जात निहाय जनगणना करावी, यासाठी देखील मराठा नेत्यांनी सहकार्य केलं पाहिजे. तशी ठोस भूमिका घेतली पाहिजे. पण ते खोटी आकडेवारी सांगून कळत नकळत ओबीसींच्या हक्कावर अतिक्रमण करण्यात आणि दिशाभूल करण्यात व्यस्त आहेत. अर्थात भाजपा किंवा फडणवीस यांना असा संघर्ष हवा आहे, याची जाण बऱ्याच ओबीसी किंवा मराठा नेत्यांनाही नसावी. किंवा असली तरी सत्तेसाठी त्यांची काही मजबुरी आहे, म्हणून ते भाजपाच्या इशाऱ्या वर नाचत आहेत.

यात आणखी एक गम्मत आहे. २०१९ म्हणजे उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होण्यापूर्वी आणि २०१४ नंतर सेनेला किंवा उद्धव ठाकरे यांना समजण्यात जशी भाजपची किंवा इतर राजकीय पंडितांची गफलत झाली, अगदी तशीच गफलत मराठा नेत्यांची ओबीसी समाजाला गृहीत धरण्यात झाली. बहुतेक सारे तथाकथित ओबीसी नेते मराठा किंवा इतरांचे गुलाम आहेत. हा इतिहास आहे. आणि तेच गृहीत धरून आपण ओबीसीवर अन्याय करणारं मराठा आरक्षण धोरण भाजपशी संगनमत करून पास करून घेतलं, तरी ओबीसी मधून फारशी विरोधी प्रतिक्रिया येणार नाही, या भ्रमात मराठा नेते राहिले. मराठा मोर्च्यात कुणबी समाज मोठ्या प्रमाणात सहभागी होत असल्यामुळे तर मराठा नेते जास्तच गाफील झाले होते. त्याचप्रमाणे केंद्रातील सत्ता आपलीच आहे, न्यायालये आपल्या खिशात आहेत आणि पुढील सत्ताही आपलीच येणार, या भ्रमात फडणवीस आणि त्यांचे सल्लागार राहिले. उद्धव ठाकरे सत्ता कधीही सोडणार नाहीत, ते सत्तेसाठी लाचार आहेत, असा ठाम समज त्यांनी करून घेतला होता. मागील सत्तेत मानसन्मान विसरून सेना 'बिन बुलाये मेहमान'.. म्हणून सामील झाली होती. अनेक अपमान झेलूनही त्यांचे जाहीरनामे खिशातून बाहेर निघाले नव्हते.

असाच आणखी एक घोळ झाला, तो म्हणजे, राष्ट्रवादी आणि काँग्रेसचा सुपडा साफ होणार ! असा अतिरेकी विश्वास फडणवीस यांना वाटत होता. तसा खुद्द काँग्रेस, राष्ट्रवादी वाले सुद्धा अगदी कोमात गेले होते. काँग्रेस आघाडी मिळून ५० चा आकडा सुद्धा पार करू शकणार नाही, त्यामुळे सेनेला फरफटत आपल्या मागे येण्याशिवाय गत्यंतर नाही, या गुमीत फडणवीस आणि कंपनी एकदम झिंगत होती. थोडक्यात काहीही झालं तरी भाजपाला सोडून पर्यायी सरकार स्थापन करण्यासारखी परिस्थिती महाराष्ट्रात अशक्य आहे, या भ्रमात फडणवीस यांचा फुगा आणखीच फुगत गेला.

निकाल पाहून मात्र सर्वांच्याच भ्रमाचे भोपळे फुटले. जनतेनं आपला झटका दाखवला. काँग्रेस, राष्ट्रवादीच्या जागा वाढल्या. भाजपाला बाजूला ठेवून पर्यायी आणि संख्येच्या दृष्टीनं मजबूत सरकार बनू शकते, असा जनादेश मिळाला. आणि उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी नेमकी तीच संधी साधली.

या पार्श्वभूमीवर विचार केल्यास.. मराठा आरक्षण ही अती हुशारी दाखवणाऱ्या राजकारणी लोकांच्या 'गले की हड्डी बनलं आहे' ! सवीच्च न्यायालयानं मराठा आरक्षण रद्द ठरविल्यामुळे एक नवाच पेच महाराष्ट्रात उभा राहिला.

मुळात मंडल आयोगाच्या निकषानुसार आरक्षण देतांना आयोगानं मराठा समाजाचा ओबीसी मध्ये समावेश केला नव्हता. कारण मागासलेपणाच्या तत्कालीन कसोट्यामध्ये मराठा समाज बसत नव्हता. मराठा समाजात बरेच गरीब लोक आहेत, ही वस्तुस्थिती असली तरी सामाजिक, शैक्षणिक मागासलेपणाचे निकष मराठा समाजाला लागू होत नाहीत, ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. आणि म्हणूनच आरक्षणाच्या समर्थनासाठी मग.. मराठे आणि कुणबी एकच आहेत, मराठे आणि कुणब्यांच्या सोयारिकी होतात, असली मोघम आणि तकलादू उदाहरणं दिली जातात. सोयरिक हाच मुद्दा गृहीत धरायचा असेल, तर मग ब्राम्हण समाजामध्ये सर्वात जास्त आंतरजातीय विवाह होत असतात. याचा अर्थ ब्राह्मण समाजाला पण मागासवर्गीय समजून आरक्षण देता येईल का ?



मंडल आयोगानं मागासलेपणाच्या काय कसोट्या ठरविल्या होत्या ते आपण बघू या.. म्हणजे पुढील चित्र आणखी स्पष्ट होईल.

**■सामाजिक आधार**

१) ज्या जातींना इतर वर्ग किंवा जाती द्वारा मागास समजले जाते.

२) अशा जाती की ज्यांचा उदरनिर्वाहासाठी शारीरिक श्रम हाच मुख्य आधार आहे.

३) ज्या जाती किंवा समुहामध्ये १७ पेक्षा कमी वयाच्या मुलींचा लग्नाचा सरासरी दर ग्रामीण भागात राज्याच्या सरासरीपेक्षा २५ टक्के आणि शहरी भागात पेक्षा १० पेक्षा जास्त आहे. तसेच पुरुषांच्या बाबतीत ग्रामीण भागात १० टक्के आणि शहरी भागात ५ टक्क्यांनी जास्त आहे.

**■शैक्षणिक आधार**

१) ज्या जातीमध्ये ५ ते १५ वयाच्या मुलांचं शाळेत न जाण्याचं प्रमाण राज्याच्या सरासरी पेक्षा २५ टक्क्यांनी अधिक आहे.

२) याच वयोगटातील विद्यार्थ्याचं मध्येच शाळा सोडण्याचं प्रमाण राज्याच्या सरासरीच्या कमीत कमी २५ टक्के आहे.

३) ज्या जाती किंवा वर्गामधील मॅट्रिक पास करणारे विद्यार्थी - विद्यार्थिनींची संख्या राज्याच्या तुलनेत २५ टक्क्यांनी कमी आहे.

**■आर्थिक आधार**

१) ज्या जाती किंवा वर्गाच्या लोकांचे सरासरी कौटुंबिक संपत्तीचे मूल्य राज्याच्या टक्केवारीपेक्षा २५ टक्क्यांनी कमी आहे.

२) ज्या जाती किंवा वर्गातील कच्च्या घरामध्ये राहणा?या लोकांची संख्या राज्याच्या सरासरीच्या कमीत कमी २५ टक्के आहे.

३) ज्या जाती किंवा वर्गातील ५० टक्के महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी अर्धा किलोमिटर दूर जावे लागत असेल.

मंडल आयोगाची स्थपना १९७९ मध्ये करण्यात आली होती. मुस्लिम समाजातील आणि इतरही अशा एकूण ३७४३ जातींचा त्यात समावेश होता. सुमारे तीस वर्षापूर्वीच्या ह्या कसोट्या लक्षात घेतल्या तर आयोगानं मागासलेपणा ठरवताना किती बारीक अभ्यास करून निकष ठरवले आहेत, हे लक्षात येईल. गायकवाड आयोगासारखी दिशाभूल करणारी आकडेवारी त्यांनी ठोकून दिली नाही. मंडल आयोगाचे सदस्य देशभर फिरले. लाखो लोकांच्या भेटी घेतल्या, निवेदन स्वीकारले, चर्चा केली. आणि एवढी मेहनत घेवुन आयोगानं ओबीसींची संख्या ५२ टक्के मान्य करून त्यांना २७ टक्के आरक्षण देण्याची शिफारस केली. त्यावेळी ओबीसी मध्ये कुणबी समाजाचा नैसर्गिक न्यायानं, मागासलेपणाच्या सर्व कसोटीवर घासून नंतरच समावेश झाला होता. मात्र मराठा समाज त्या कसोटीत बसत नसल्यामुळे त्याला त्यातून बाहेर ठेवण्यात आलं होतं, ही वस्तुस्थिती आहे. असं असताना पुन्हा पुन्हा दिशाभूल का केली जाते ?

आरक्षणाची व्यवस्था ही सामाजिक मागासलेपणा दूर करण्यासाठी समान संधी देण्याचा प्रयत्न आहे. ती काही रोजगार हमी योजना नव्हे. बरं मंडल आयोग संपूर्ण देशासाठी होता आणि मराठा समाज महाराष्ट्रात. तेव्हा मंडल आयोगाला मराठा समाजाबाबत आकस असण्याचं काही कारण होतं का ? शिवाय आर्थिक मागास वर्गासाठी १० टक्के वेगळं आरक्षण दिलं गेलं आहे.

तरीही फडणवीस आणि कंपू दिशाभूल का करत आहेत ? उगाच मराठा आणि कुणबी/ओबीसी समजाच्या बाबतीत बुद्धिभेद का करत आहेत ? काही मराठा नेते देखील आगीत तेल ओतण्याचं काम का करत आहेत ? इतकी वर्षे महाराष्ट्राची सत्ता मराठा समाजाच्या हातात होती, आजही आहे. अर्ध्यापेक्षा जास्त मुख्यमंत्री त्यांचेच झालेत, अर्धे मंत्रिमंडळ त्यांचेच असते, तरी मराठा समाजाची आर्थिक प्रगती का झाली नाही ? त्याला जबाबदार हे सरंजामी वृत्तीचे मराठा नेते नाहीत का ? की त्यालाही जबाबदार ओबीसी समाज आहे ? मराठा नेत्यांच्या शिक्षण संस्था आहेत, साखर कारखाने आहेत, विविध उद्योग आहेत, सहकारी बँका आहेत, सोसायट्या आहेत, त्याचा फायदा जर खुद्द मराठा समाजातील गरीब लोकांना झाला नसेल, तर मग यांनी इतरांसाठी काय काय केलं असेल ? मग यांनी सत्ता कोणासाठी राबवली ? ती त्यांच्या हातून का काढून घेवू नये ? ती काय त्यांची खाजगी प्रॉपर्टी आहे का ? प्रत्येकाला संख्येच्या प्रमाणात समान वाटा का असू नये ?

कुणबी समाजाची अवस्था आजही कशी आहे, ते कोकणात जाऊन बघायला हवं. त्यांच्यावर झालेला अन्याय दूर करायचा की आणि त्यांच्याच ताटातील घास पळवून न्यायचा ? हे कारस्थान नेमकं कशासाठी ? कुणाच्या इशाऱ्यावर सुरू आहे ?

नेमका त्याच वेळी स्थानीय स्वराज्य संस्था मधील ओबीसी, भटक्या विमुक्त जाती - जनजाती आणि विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी असलेलं आरक्षण रद्द करण्याचा निर्णय सुप्रीम कोर्टानं दिला आहे. कारण त्यासाठी जो डाटा हवा होता तो फडणवीस सरकारनं सादर केला नाही, ही बदमाशी भाजपा सरकारनं का केली ? डाटा त्यांच्या केंद्र सरकारकडे तयारच होता !

थोडक्यात, आरक्षण पूर्णतः संपुष्टात आणण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. आणि त्या पापात ओबीसी किंवा मराठा आरक्षणासाठी एकांगी गळे काढणारे सद्याचे नेते सुद्धा स्वतः सामील आहेत, हे दुर्दैव आहे !

खरं तर..दिल्लीमध्ये यांचीच सत्ता आहे, तिकडे जाऊन फडणवीस किंवा दोन्ही खासदार भोसले हे लोक मोदींना का भेटत नाहीत ? त्यांना कायदा करायला का सांगत नाहीत ? डाटा का देत नाहीत ? ही समाजाची दिशाभूल नाही का ? नव्या निर्णयामुळे ओबीसींच्या हक्कावर जी गदा आली त्याबद्दल मराठा नेते काहीच का बोलत नाहीत ? त्याबद्दल त्यांची भूमिका नेमकी काय आहे ? ओबीसींनी मराठा आरक्षणाला समर्थन द्यायचं, पण ओबीसी मेला तरी मराठा नेत्यांनी काहीही बोलायचं नाही, याचा नेमका अर्थ काय होतो ? ओबीसी त्यांचा गुलाम आहे का ?

सुप्रीम कोर्टाच्या नव्या निर्णयामुळे महाराष्ट्रात सुमारे ३६ हजार ग्रामंचायती, ३५० नगर परिषद, पंचायत समित्या, नगर पंचायती, २४ जिल्हा परिषदा आणि २७ महानगर पालिका यामध्ये ओबीसींना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवलं जाणार आहे. हा ओबीसी विरोधी मोठ्या कटाचा भाग आहे. देशात ५२ टक्के असलेला ओबीसी समाज आणि पर्यायानं त्याचं आरक्षण.. हेच भाजपाला खतम करायचं आहे. एकदा ओबीसी बर्बाद झाला की नंतर एससी, एस्टी, एन टी वगैरे समुदायचं आरक्षण संपुष्टात आणायला त्यांना सहज सोपं जाईल. कारण ओबीसींचं आरक्षण गेल्यामुळे त्या समाजात मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाच्या बाबतीत पुन्हा हेच लोक विष पेरण्याचं काम करतील. ओबीसी समाजात रोष निर्माण होईल, असा प्रयत्न करतील. हाच भाजपा आणि इतर पक्षातील उच्चवर्णीय नेत्यांचा खरा डाव आहे. आपल्या मांडीला मांडी लावून मागासवर्गीय किंवा स्वतःच्या समाजातील गरिबांनी बसायला नको, ही त्यांची खरी भावना आहे. म्हणून तर 'मराठा समाजाला मिळत नसेल, तर सर्वांचं आरक्षण रद्द करा' अशी भूमिका भाजपचे खासदार उदयन भोसले यांनी जाहीरपणे बोलून दाखवली आहे !

पण आता हे कारस्थान ओबीसी समाजाच्या लक्षात यायला लागलं आहे. काही ओबीसी अजूनही फितुरी करत असले, तरी समाज मोठ्या प्रमाणात जागा होत आहे. संघटित होत आहे. मराठा आरक्षणाला त्याचा विरोध नाही. मात्र ओबीसीवर पद्धतशीर सुरू असलेलं अतिक्रमण आता त्याला मान्य नाही. तोही स्वतःच्या हित रक्षणासाठी सज्ज होतो आहे. संघटित होतो आहे. याचा परिणाम लौकरच आपल्याला पाहायला मिळेल. महाराष्ट्राच्या राजकारणात तर पुढील काळ ओबीसींच्या वर्चस्वाचाच असेल, यात शंका नाही. तसाही ओबीसींचा राजकीय बॅकलॉग फार मोठा आहे !तेव्हा..भाजपा किंवा फडणवीस यांच्या कारस्थानाला बळी न पडता मराठा नेत्यांनी ओबीसीच्या संख्ये एवढ्या आरक्षणाच्या भूमिकेला निःसंदिग्ध समर्थन देणं गरजेचं आहे. ओबीसी तर मराठा समजासोबत आहेच..! तशीच सहकार्य आणि सामजस्याची भूमिका मराठा नेत्यांनीही घेतली तर हा भाजपाला हवा असलेला ओबीसी - मराठा संघर्ष होण्याचं काहीही कारण नाही ! उलट समस्या सुटायला मदत होईल ! समतेचा नवा इतिहास लिहिला जाईल ! आपण या क्षणापासून सुरुवात करू या..! तूर्तास एवढंच..

**ज्ञानेश वाकुडकर**
**अध्यक्ष, लोकजागर**
**९८२२२७८९८८**

# पुण्यात एमटेक शिकण्याचा विचार आहे पण माहिती नाही कुठे? युनिपुने तपासा!

एम.टेकचा पाठपुरावा करणे तुमच्या मनातली पुढील गोष्ट आहे? जर होय, तर इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांना एम.टेक कोर्स उपलब्ध करुन देणाऱ्या विद्यापीठांपैकी युनिपुणे पुणे हे एक विद्यापीठ आहे. तंत्रज्ञान संशोधन क्षेत्रात काम करण्याची योजना आखणाऱ्या संशोधन-केंद्रित विद्यार्थ्यांमध्ये मास्टर्स ऑफ टेक्नॉलॉजी (M.Tech) हा सर्वात लोकप्रिय अभ्यासक्रम आहे. युनिपुने येथे शिकविल्या जाणाऱ्या एम.टेक प्रोग्राममुळे उमेदवारांना तंत्रज्ञानाची क्षेत्रे एक्सप्लोर करण्याची आणि अनोखी आणि अधिक प्रेरणादायक कल्पना येऊ शकतात. हे एकूणच तंत्रज्ञान मजबूत करेल

**युनिपुणे विद्यापीठाबद्दल संक्षिप्त**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (UniPune), पुणे कायद्याद्वारे १९४९ मध्ये अस्तित्त्वात आले. सध्या हे भारतातील प्रमुख विद्यापीठांपैकी एक आहे, ज्यास "पूर्व दिशेच्या ऑक्सफोर्ड' नावाने ओळखले जाते. विद्यापीठाला एनएएसीकडून "ए' ग्रेड मान्यता मिळाली असून एनआयआरएफ२०२० मध्ये ते 9th व्या स्थानावर आहे. हे यूजीसी-मान्यताप्राप्त विद्यापीठ आहे.

**युनिपुणे - एम.टेक आणि पीएचडी कोर्स**

एम.टेक हा व्यावसायिक पीजी अभियांत्रिकी मास्टर पदवी आहे जो पदवीधरांना दोन वर्षांचा अभ्यासक्रम संपल्यानंतर मंजूर आहे. ऑफर केलेली विविध वैशिष्ट्ये अशी आहेत - सिव्हिल अभियांत्रिकी, संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी, केमिकल अभियांत्रिकी, इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, यांत्रिकी अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स आणि संप्रेषण अभियांत्रिकी आणि बरेच काही.

सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी डिपार्टमेंटचे उद्दीष्ट संशोधन-अभ्यासक्रम उपलब्ध करणे आहे जे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानावरील उद्योग-संबंधित संशोधन समस्या सहजपणे सोडविण्यास मदत करतात. विभाग उद्योग-विद्यापीठाने प्रायोजित एकात्मिक एमटेक + पीएचडी (चढ्शलह + झहऊ) कार्यक्रम चालविला आहे.

तांत्रिक क्षेत्रातील नाविन्यास प्रेरित करण्यासाठी विद्यापीठ पारंपारिक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे मिश्रण वापरते. अभ्यासक्रम अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून विविध शोध-देणाऱ्या प्रकल्पांचा समावेश आहे. इथल्या एमटेक प्रोग्रमचा पाठपुरावा करणा विद्यार्थ्यांना उद्योग-केंद्रित प्रकल्पांवर काम करण्याची संधी मिळते जे भविष्यात त्यांना उद्योगात तयार होण्यास मदत करतात.

**युनिपुने येथे ऑफर केलेली एम.टेकची विविध वैशिष्ट्ये**

❒माहिती सुरक्षा
❒संगणक व माहिती तंत्रज्ञान
❒केमिकल आणि बायोटेक्नॉलॉजी
❒युनिपुनेची किमान पात्रता निकष
❒पीजी प्रवेश पूर्णपणे पुणे विद्यापीठाने घेतलेल्या ओईई परीक्षेतील उमेदवाराच्या कामगिरीवर आधारित आहे.
❒गेट पात्रता करणारे उमेदवार येथे एमटेक कोर्ससाठीही अर्ज करू शकतात.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करून डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)




❒एम.टेक - पीएचडी कोर्ससाठी अर्ज करणारे उमेदवार संबंधित ईींशलह / इए पदवी उत्तीर्ण असावेत.
❒युनिपुनेसच्या एमटेक प्रोग्रामचा कोर्स अभ्यासक्रम
❒एम. टेक कोर्सचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनी निवडलेल्या स्पेशलायझेशननुसार वेगळा असतो. युनिपुने येथील एम.टेक या अभ्यासक्रमाचा अभ्यासक्रम आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मानकांचा विचार करून तयार केला गेला आहे. युनिपुने येथील एम.टेकला शिकविलेल्या मुख्य विषयांमध्ये:

**केमिकल अभियांत्रिकी**
**प्रक्रिया नियंत्रण आणि इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी**

❒संगणक विज्ञान आणि अभियांत्रिकी
❒सॉफ्टवेअर अभियांत्रिकी
विद्युत अभियांत्रिकी उ ज ा
प्रणाल्या अभियांत्रिकी
❒यांत्रिक अभियांत्रिकी
औष्णिक अभियांत्रिकी
❒इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन अभियांत्रिकी
❒व्हीएलएसआय सिस्टम डिझाइन
❒बायोइन्स्ट्रेशन / डायग्नोस्टिक्स बायोमेडिकल मटेरियल आणि मेकॅनिक्स
❒कॉम्प्लेक्स सिस्टम डेव्हलपमेंट डेटा खनन आणि विश्लेषणात्मक विपणन
❒औषध वितरण आणि सेल्युलर / ऊतक अभियांत्रिकी
गतिशीलता, नियंत्रणे आणि रोबोटिक्स
❒ऊर्जा आणि शाश्वत विकास
❒पर्यावरण आणि जल संसाधन प्रणाल्या अभियांत्रिकी
❒पर्यावरण फ्लुइड मेकॅनिक्स आणि हायड्रोलॉजी पर्यावरण भौगोलिकशास्त्र

**युनिपुने येथे कौशल्य जाणून घ्या:**

❒युनिपुने येथे शिकत असताना एमटेक पदवीधरांकडून शिकण्याची काही कौशल्ये पुढीलप्रमाणे:
❒परिमाणात्मक विश्लेषण कौशल्ये
❒संशोधन कौशल्य
❒संभाषण कौशल्य
❒तार्किक आणि तर्क कौशल्य
❒विश्लेषणात्मक कौशल्य
❒दबावाखाली काम करण्याची क्षमता

**वैयक्तिक कौशल्य**
**युनिपुने येथे प्लेसमेंट**

❒युनिपुने प्लेसमेंट सेल प्लेसमेंटच्या संधी देते आणि सर्व पात्र व पात्र विद्यार्थ्यांची नेमणूक सुनिश्चित करते. विद्यापीठात आयोजित केलेल्या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये भाग घेणाऱ्या काही कंपन्या आहेत-
❒एकत्रित
❒अमेझॅटिक सोल्यूशन्स
❒सामग्री स्पिअर
❒CommVault
❒ॲग्रोस्टार
❒अमेझॉन वेब सर्व्हिसेस
❒सोल्यूशन्स प्रज्वलित करा
❒KPoint तंत्रज्ञान
❒राष्ट्रीय माहिती केंद्र
❒अमेझॉन
❒एनव्हीडिया
❒सिंटेल
❒SAP लॅब
❒टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि इतर बरेच काही.
❒२०१८ मध्ये युनिपुनेच्या पदवीधरांना दिले जाणारे सर्वात जास्त वेतन पॅकेज प्रतिवर्षी आयएनआर ७.४ लाख होते, तर मध्यम वेतन वार्षिक २.५ लाख होते आणि किमान वेतन दोन लाख होते.

**भविष्यकालीन एम.टेकची व्याप्ती**

❒एम.टेक पदवीधरांच्या नोकरीच्या संधी प्रचंड आहेत, तांत्रिक क्षेत्रात अमर्यादित नोकरीचे पर्याय शोधता येतील. अभियंता म्हणून नियुक्त होण्याव्यतिरिक्त, एमटेक पदवीधरांना सल्लागार, विषय तज्ञ, संशोधक, व्यवस्थापक इत्यादी देखील नियुक्त केले जातात.
❒एम.टेक पदवीधरांसाठी उपलब्ध काही लोकप्रिय नोकरी पर्यायांमध्ये:
❒संगणक विज्ञान अभियंता
❒सोफ्टवेअर अभियंता
❒यांत्रिकी अभियंता
❒इलेक्ट्रॉनिक्स अभियंता
❒खाण अभियंता
❒इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन अभियंता
❒व्याख्याता
❒संशोधक इ.
❒मान्यताप्राप्त कंपन्यांमध्ये काम करण्याव्यतिरिक्त, एमटेक पदवीधर देखील स्वतःचे उपक्रम सुरू करू शकतात.

**उच्च शिक्षणाची व्याप्ती**

UniPune येथे देण्यात आलेली एम.टेक ही पदव्युत्तर पदवी आहे, जे बी.टेक कोर्स पूर्ण केल्यावर विद्यार्थी करू शकतात. एम. टेक कार्यक्रमांतर्गत वेगवेगळ्या वैशिष्ट्यांचा शोध विद्यार्थ्यांना घेता येतो. च.ढ्शलह पदवीधरांना उपलब्ध असलेल्या काही उच्च अभ्यासाच्या पर्यायांचा समावेश आहे:

❒पीएचडी
❒एमबीए
❒अभियांत्रिकी प्रमाणपत्र प्रमाणपत्र
❒हे सर्व पर्याय युनिपुनेमध्येच उपलब्ध आहेत. तसेच, अधिक शिक्षण मिळविणे विद्यार्थ्यांना संशोधनात करियर बनविण्यात फायद्याचे ठरेल आणि एखाद्या संस्थेत उच्च पद व्यवस्थापकीय पदांवर कब्जा करू शकेल.

बऱ्याच विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणासाठी निधीची व्यवस्था करणे सोपे काम नाही. अशा प्रकारे सावध विद्यार्थ्यांची चिंता समजून घेऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देते. यापैकी काही शिष्यवृत्ती आहेतः

**यूके इंडिया एज्युकेशन अँड रिसर्च इनिशिएटिव्ह स्कॉलरशिप**

❒यूके सरकार चेवेनिंग शिष्यवृत्तीचा जागतिक शिष्यवृत्ती कार्यक्रम
❒जीओआय शिष्यवृत्ती
❒आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती एससी / एसटी उमेदवारांसाठी राजीव गांधी फेलोशिप (एमफिल आणि पीएचडी)
❒त्यांच्या एमफिलसाठी शिकणाऱ्या पहिल्या २ रँकधारकांसाठी फेलोशिप
❒राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती
❒अनुसूचित जाती / जमाती / डीएनटी / नव-बौद्ध विद्यार्थ्यांसाठी बीसी शिष्यवृत्ती

BTech पूर्ण केल्यावर एम.टेक कोर्स पोस्टचा पाठपुरावा करणे विद्यार्थ्यांचे कौशल्य आणि शिक्षणाची संधी वाढविण्याच्या विचारसरणीसाठी योग्य निर्णय आहे. एम.टेक पदवीधर आय.टी., फायनान्स, आर्ट्स, मेडिसिन, डिफेन्स इत्यादी विविध क्षेत्रात करियरच्या उत्तम संधी शोधू शकतात. त्यामुळे युनिपुने येथील MTech प्रोग्रॅमसाठी नावनोंदणी व्हा आणि आपली करिअर योग्य मार्गावर घ्या.

# ओबीसींच्या आरक्षणाला संरक्षण दिल्याशिवाय आगामी निवडणुका होऊ द्यायच्या नाहीत




**पुणे:-** "ओबीसी राजकीय आरक्षण संदर्भात लोणावळ्यात चिंतनमंथन शिबिर पार पडले. हे शिबीर निर्णय आणि निश्चयाचे आहे. तीन-चार महिन्याच्या आत इम्पिरिकल डाटा तयार करून सवीच्च न्यायालयात सादर करावा. ओबीसींच्या आरक्षणाला संरक्षण दिल्याशिवाय आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होऊ द्यायच्या नाहीत." असं भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांनी म्हटलं आहे. लोणावळ्यात (रविवार) ओबीसी नेत्यांचं चिंतनमंथन शिबीर पार पडलं यामध्ये बोलताना त्यांना भूमिका मांडली.

पंकजा मुंडे म्हणाल्या, "आधी मराठा समाजाचे शैक्षणिक आणि नोकरीमध्ये आरक्षण रद्द, तर आता ओबीसी राजकीय आरक्षण रद्द किती घोर अन्याय आहे दोन्ही वर!! माध्यमाची आणि लोक प्रतिनिधींची भूमिका महत्त्वाची वितुष्ट येईल असे होऊ देऊ नका हात जोडून विनंती आहे."

तसेच, "हे शिबीर निर्णय आणि निश्चयाचे आहे. तीन-चार महिन्याच्या आत इम्पिरिकल डाटा तयार करून सर्वोच्च न्यायालयात सादर करावा. ओबीसींच्या आरक्षणाला संरक्षण दिल्याशिवाय आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होऊ न देण्यासाठी सरकारने न्यायालयात जावे." असे देखील पंकजा मुंडेनी यावेळी बोलून दाखवले.तर, "ओबीसींना आरक्षण परत मिळाल्याशिवाय राज्यात निवडणुका होऊ देणार नाही; आतापर्यंत अनेक निवडणुका पुढे ढकलल्या तशा ह्या देखील ढकलाव्यात" ओबीसींच्या हक्कासाठी राजधानीत चक्काजाम करू, न्यायालयात जाऊः "चक्का जाम तो झाकी है, असली आंदोलन अभी बाकी है" असं काल पंकजा मुंडे यांनी ट्विट केलं होतं. "मराठा ओबीसींत वाद राजकारण करू नका हे महापाप आहे. भिंत उभी करू नका.

सामाजिक मागासलेपण दुर करण्यासाठी आरक्षण शाहू महाराज, आंबेडकरांनी दिलय. हा सामाजिक परिवर्तनाचा लढा, नेतृत्व माझे नाही तुमचं आहे, ही लढाई आपल्याला सर्वांनी मिळून जिंकायची आहे. आम्ही न्याय दिला होता पण सरकार बदलले. सरकारने वेळ घालवला. डाटा तयार केला नाही. इम्पिरिकल डाटा तयार करण्याचे काम सरकारचे त्यांनी ते करावं." असं देखील पंकजा मुंडे यांनी म्हटलेलं आहे.

# ओबीसींच्या आरक्षणासाठी भाजपाचा आक्रोश





**गोंदिया:** ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण घालवणाऱ्या महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्त्या कारभाराविरोधात जाहीर निषेध करत ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण पूर्ववत करण्याच्या मागणीसाठी शनिवार २६ जून रोजी भारतीय जनता पाटीतर्फे जिल्ह्यातील आठही तालुकास्थळी जेल भरो आंदोलन करण्यात आले. यावेळी भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्त्यांना अटक करून सुटका करण्यात आली.

गोंदिया शहर व ग्रामीण मंडळातर्फे येथील जयस्तंभ चौकात खा. सुनील मेंढे यांचा नेतृत्वात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. प्रसंगी माजी आमदार रमेश कुथे, माजी जिप अध्यक्ष नेतराम कटरे, नगराध्यक्ष अशोक इंगळे, जिल्हा महामंत्री संघटन संजय कुळकणी, शहराध्यक्ष सुनील केलनका, ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनलाल ठाकरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष भावना कदम, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय टेंभरे, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष दीपक कदम, नप सभापती राजकुमार कुथे, जिल्हा उपाध्यक्ष नंदकुमार बिसेन, अशोक चौधरी, राजेश चतुर, ऋषिकांत साहू, गजेंद्र फुंडे, मनोज मेंढे, अशोक हरिणखेडे, अमित झा, सुधीर ब्राम्हणकर, योगराज रहांगडाले, संजय मुरकुटे, तिजेश गौतम, मुकेश चन्ने, चंद्रभान तरोणे, माधुरी रहांगडाले, देवचंद नागपुरे, अर्जुन नागपुरे, राजेश नागरीकर, गुड्डू कारडा, पारस पुरोहित, पलाश लालवानी यांच्यासह बहुसंख्य भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते. जोपर्यंत ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत होत नाही तो पर्यत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेऊ नयेत. या मागणीसह अन्य मागण्या भाजपाच्या वतीने शासनला पाठविण्यात आलेल्या. निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

**सडक अर्जुनी :** येथे ओबीसी समाजाला पुन्हा राजकीय आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसह शेतकऱ्यांचा खरीप हंगामातील धानाचा बोनस द्यावा, उन्हाळी हंगामातील धान खरेदीत होणाऱ्या दिरंगाईला जबाबदार राज्य सरकारच्या निषेधार्थ भाजपा सडक अर्जुनीतर्फे माजी मंत्री इंजि. राजकुमार बडोले यांच्या नेतृत्वात कोहमारा येथे राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर उतरून "चक्काजाम आंदोलन' करण्यात आला. यावेळी ओबीसी आघाडी प्रदेश सदस्य चामेश्वर गहाणे, भाजपा तालुकाध्यक्ष अशोक लंजे, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. भुमेश्वर पटले, जिल्हा सचिव शेषराव गिऱ्हेपुंजे, लक्ष्मीकांत धानगाये, महामंत्री गिरधारी हत्तीमारे, शिशिर येळे, परमानंद बडोले, युवा मोर्चा जिल्हा महामंत्री हर्ष मोदी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष विलास बागडकर, गौरेश बावनकर, प्रल्हाद कोरे, शहराध्यक्ष राजेश बारसागडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते बहु संख्येने उपस्थित होते. या बैलगाडी मोर्चाने प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले होते.

## भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांना अटक व सुटका

**आमगाव :** येथील तालुका भाजपाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचे नेतृत्व माजी आमदार तथा भाजपचे प्रदेश सचिव संजय पुराम यांनी केले. यावेळी तहसील कार्यालयासमोर सभेचे आयोजन करून मागण्यांचे निवेदन तहसीलदार दयाराम भोयर यांना सादर करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष ॲड. येसूलाल उपराडे, तालुका अध्यक्ष काशीराम हुकरे, महामंत्री नरेंद्र बाजपेयी, राजू पटले, राकेश शेंडे, नगराध्यक्ष पिंटू अग्रवाल, कृष्णा चूटे, मनोज सोमवंशी, रघुनाथ भुते, महिला मोर्चा जिल्हा महामंत्री सुनंदा उके, तालुका महिला मोर्चा अध्यक्ष सुषमा भुजाडे, अंजली जांभूळकर, निमेश दमाहे, कमलेश चूटे, अशोक पटले, उमेश रहांगडाले, प्रकाश शिवणकर, बाळू भुजाडे, हरीहर मानकर, जयप्रकाश शिवणकर, हुकूम बोहरे, युवराज पटले, दिनू थेर, यशवंत पुंडे, सुधीर पटले, बाबूलाल तुरकर, गजानन भांडारकर, सूर्यकांत झा, यशवंत मानकर, संगीता वाटकर, धनवंता वटी, संगीता ब्राह्मणकर, छाया फुंडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

**तिरोडा :** स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसीचे आरक्षण रद्द करण्याच्या निषेधार्थ आज भाजपाच्या वतीने आयोजित चक्काजाम आंदोलनात खा.सुनील मेंढे सहभागी झाले होते. यावेळी स्थानिक आमदार विजय रहांगडाले, नगराध्यक्षा सोनाली देशपांडे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष ओम कटरे, तालुकाध्यक्ष भाऊराव कठाणे, शहराध्यक्ष पटले आदी उपस्थित होते. आघाडी सरकारच्या दुर्लक्षित धोरणामुळे आंदोलन करण्याची वेळ ओबीसी समाजावर आली आहे. ओबीसींचा राजकीय अधिकार मिळाल्याशिवाय आपण शांत बसणार नसल्याचे मेंढे यांनी यावेळी सांगितले. तुमसर-गोंदिया मार्गावरील चंद्रभागा नाका चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. दरम्यान जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेले पालक मंत्री नबाब मलीक यांच्या मार्गात दोनदा बदल करण्यात आल्याची माहिती आहे.

**अर्जुनी मोर :** स्वार्थाच्या राजकारणासाठी ओबीसींच्या आरक्षणावर वार करीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधून ओबीसींना डावलण्याचा कुटील डाव रचला. दीड वर्षापासून शेतकरी सातशे रुपये बोनस साठी प्रतीक्षा करीत आहे, नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन मदतीच्या घोषणेचा विसर पडला. तालुक्यातील ५२ ग्रामपंचायतींचे पथ दिव्यांची विज खंडीत केली. जनतेला पावसाच्या दिवसात काळोखात ठेवण्याचे महापाप करीत त्रिकुट सरकारने जनतेचा घात केल्याचा आरोप भाजपाचे तालुका अध्यक्ष अरविंद शिवणकर यांनी केला. ते भाजपाच्या वतीने स्थानिक महाराणा प्रताप चौकात आज आयोजित आघाडी सरकारच्या निषेधार्थ चक्काजाम आंदोलनाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य रचना गहाणे, माजी सभापती प्रकाश गहाणे, भाजपा जिल्हा महामंत्री लायकराम भेंडारकर, उमाकांत ढेंगे, डॉ. गजानन डोंगरवार, महिला आघाडी जिल्हा उपाध्यक्ष किरण कांबळे, नामदेवराव कापगते, रघुनाथ लांजेवार, केवळराम पुस्तोडे, देवेंद्र टेंभरे, कृष्णा झोळे, रत्नाकर बोरकर, प्रमोद पाऊलझगडे, वर्षा घोरमोडे, मिना शहारे, तेजुकला गहाणे, कमल पाऊलझगडे, विजय कापगते, गिरीश बागडे, विनोद नाकाडे, भोजराज लोगडे, व्यंकट खोब्रागडे उपस्थित होते. यावेळी महाराणा प्रताप चौकात आंदोलकांनी सरकारच्या विरोधात नारेबाजी केली. आंदोलन काळात वाहतूक ठप्प पडली होती. पोलिस उपनिरीक्षक प्रशांत भुते यांच्या नेतृत्वात पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. प्रास्ताविक लायकराम भेंडारकर यांनी केले. संचालन भोजराज लोगडे यांनी केले तर आभार प्रदर्शन उमाकांत ढेंगे यांनी केले.

# ओबीसींच्या आरक्षणासाठी काँग्रेसचे निषेध आंदोलन

**गोंदिया:** भाजपाने आज केलेल्या आंदोलनाच्या पावलावर पाऊल ठेवत काँग्रेसतर्फेही ओबीसींचे राजकीय आरक्षण कायम करण्यासाठी निषेध आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारच्या आरक्षण विरोधी धोरणामुळे ओबीसींचा आवश्यक असलेला डाटा सवीच्च न्यायालयात सादर न केल्यामुळेच ओबीसींना असलेले राजकीय आरक्षण रद्द झाले. यास सर्वस्वी तत्कालीन देवेंद्र फडणवीस सरकार व केंद्रातील मोदी सरकारच जवाबदार असल्याचा आरोप जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष ॲड. नामदेव किरसान यांनी केला.

गोंदिया तालुका काँग्रेस कमिटी, सेवादल, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एनएसयुआय, ओबीसी काँग्रेस, किसान काँग्रेस, अनु. जाती विभाग, अल्पसंख्याक विभागाच्या वतीने आज शनिवार २६ जून रोजी ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठी काँग्रेसतर्फे निषेध आंदोलन करण्यात आले. सर्वप्रथम शहिद भोला काँग्रेस भवन येथे राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत मोर्चाकाढण्यात आला. येथे बाबासाहेबांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून ओबीसींचे आरक्षण रद्द होण्यास केंद्र सरकार तथा राज्यातील तत्कालीन देवेंद्र फडणवीस सरकार जवाबदार असल्याचा आरोप करून केंद्र सरकरविरोधात घोषणा देण्यात आल्या.

आंदोलन जिल्हाध्यक्ष डॉ. एन. डी. किरसान यांचे नेतृत्वात करण्यात आले. यावेळी प्रदेश सचिव अमर वराडे, जहीर अहमद, सुर्यप्रकाश भगत, आलोक मोहंती, हरिष तुळसकर, अशोक गुप्ता, जितेन्द्र कटरे, जीतेश राणे, निलम हलमारे, योगेश अग्रवाल, रेखा बानेवार, आशिष रहांगडाले, अजय रहांगडाले, वदंना काळे, वनिता चिचाम, मंगला माहरवाडे, देवका वरकडे, वनिता उके, शिशुकला तुरकर, गौरी रहांगडाले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

## ग्रामपंचायत ताडगांव
### पंचायत समिती,अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद,गोंदिया
### निविदा सुचना

निविदा क्र.१

ग्रामपंचायत ताडगाव पंचायत समिती, अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद, गोंदिया येथे जलजिवन मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अमानत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | नळ पाणीपुरवठा योजनेची पुनर्रजोडणी (रेट्रोफिटिंग) | १३०७१४ /- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |

१)वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/०६/२०२१ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०६/०७/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय ताडगाव येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.२) सदरच्या कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ३०/०६/२०२१ ते ०६/०७/२०२१ सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय ताडगाव येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक ०७/०७/२०२१ ला ग्रामपंचायत ताडगाव येथे दुपारी १२.०० वाजे उघडण्यात येतील. ४) सदर कामांची तपशीलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**श्री.एन.एम.मडावी**
ग्रामसेवक
ग्रामपंचायत ताडगाव

**श्री.बी.एन.बोरकर**
सरपंच
ग्रामपंचायत ताडगाव

## ग्रामपंचायत सुकळी
### पंचायत समिती,अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद,गोंदिया
### निविदा सुचना

निविदा क्र.१ जा.क्र.६४,ग्रा.पं.सुकळी/२०२१ दिनांक ३०/०६/२०२१

ग्रामपंचायत सुकळी पंचायत समिती, अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद, गोंदिया येथे जलजिवन मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अमानत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १००% कुंटुबांना वैयक्तीक नळ जोडणी करणे | ७०१९३४/- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |
| २ | नळ पाणीपुरवठा योजनेची पुनर्रजोडणी (रेट्रोफिटिंग) | ६०९९१४ /- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |

१)वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/०६/२०२१ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०७/०७/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय सुकळी येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.२) सदरच्या कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ३०/०६/२०२१ ते ०७/०७/२०२१ सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय सुकळी येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक ०८/०७/२०२१ ला ग्रामपंचायत सुकळी येथे दुपारी ११.०० वाजे उघडण्यात येतील. ४) सदर कामांची तपशीलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**श्री.डी.एच.फुले**
ग्रामसेवक
ग्रामपंचायत सुकळी/खैरी

**लालसिंह दयालसिंह चंदेल**
सरपंच
ग्रामपंचायत सुकळी/खैरी

## ग्रामपंचायत सावरटोला
### पंचायत समिती,अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद,गोंदिया
### निविदा सुचना

निविदा क्र.१ जा.क्र.४०८,ग्रा.पं.सावरटोला/२०२१ दिनांक ३०/०६/२०२१

ग्रामपंचायत सावरटोला पंचायत समिती, अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद, गोंदिया येथे जलजिवन मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अमानत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १००% कुंटुबांना वैयक्तीक नळ जोडणी करणे | ४२३७०७/- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |
| २ | नळ पाणीपुरवठा योजनेची पुनर्रजोडणी (रेट्रोफिटिंग) | ---- /- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |

१)वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/०६/२०२१ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०६/०७/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय सावरटोला येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.२) सदरच्या कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ३०/०६/२०२१ ते ०६/०७/२०२१ सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय सारवटोला येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक ०७/०७/२०२१ ला ग्रामपंचायत सावरटोला येथे दुपारी १२.०० वाजे उघडण्यात येतील. ४) सदर कामांची तपशीलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**श्री.एस.के.चिमणकर**
ग्रामसेवक
ग्रामपंचायत सावरटोला

**श्री.वाय.डब्लू.तरोणे**
सरपंच
ग्रामपंचायत सावरटोला

## ग्रामपंचायत बोरटोला
### पंचायत समिती,अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद,गोंदिया
### निविदा सुचना

निविदा क्र.१ जा.क्र.४०८,ग्रा.पं.बोरटोला/२०२१ दिनांक ३०/०६/२०२१

ग्रामपंचायत बोरटोला पंचायत समिती, अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद, गोंदिया येथे जलजिवन मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अमानत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १००% कुंटुबांना वैयक्तीक नळ जोडणी करणे | ७७००९९/- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |
| २ | नळ पाणीपुरवठा योजनेची पुनर्रजोडणी (रेट्रोफिटिंग) | ८०४२८७ /- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |

१)वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/०६/२०२१ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०७/०७/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय बोरटोला येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.२) सदरच्या कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ३०/०६/२०२१ ते ०७/०७/२०२१ सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय बोरटोला येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक ०७/०७/२०२१ ला ग्रामपंचायत बोरटोला येथे दुपारी ११.०० वाजे उघडण्यात येतील. ४) सदर कामांची तपशीलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**श्री.एस.के.चिमणकर**
ग्रामसेवक
ग्रामपंचायत बोरटोला

**सौ.कुरुंदा इंद्रजित वैद्य**
सरपंच
ग्रामपंचायत बोरटोला

## ग्रामपंचायत झरपडा
### पंचायत समिती,अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद,गोंदिया
### निविदा सुचना

निविदा क्र.१

ग्रामपंचायत झरपडा पंचायत समिती, अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद, गोंदिया येथे जलजिवन मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अमानत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १००% कुंटुबांना वैयक्तीक नळ जोडणी करणे | ९२६९९५/- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |
| २ | नळ पाणीपुरवठा योजनेची पुनर्रजोडणी (रेट्रोफिटिंग) | ६६९१६ /- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |

१)वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/०६/२०२१ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०६/०७/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय झरपडा येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.२) सदरच्या कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ३०/०६/२०२१ ते ०६/०७/२०२१ सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय झरपडा येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक ०७/०७/२०२१ ला ग्रामपंचायत झरपडा येथे दुपारी १२.०० वाजे उघडण्यात येतील. ४) सदर कामांची तपशीलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**श्री.एन.एम.मडावी**
ग्रामसेवक
ग्रामपंचायत झरपडा

**सौ.के.जी.डोंगरवार**
सरपंच
ग्रामपंचायत झरपडा

## ग्रामपंचायत मोरगांव
### पंचायत समिती,अर्जुनी/मोर.जिल्हा परिषद,गोंदिया
### निविदा सुचना

निविदा क्र.१ जा.क्र.४०८,ग्रा.पं.मोरगाव/२०२१ दिनांक ३०/०६/२०२१


ग्रामपंचायत मोरगांव पंचायत समिती, अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद, गोंदिया येथे जलजिवन मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे कामाकरीता नोंदणीकृत कंत्राटधारकाकडून लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय किंमत | निविदा फॉर्मची किंमत | अमानत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | १००% कुंटुबांना वैयक्तीक नळ जोडणी करणे | ६३६०१३/- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |
| २ | नळ पाणीपुरवठा योजनेची पुनर्रजोडणी (रेट्रोफिटिंग) | १६४७१० /- | ५००/- | अंदाजपत्रकीय किंमतीच्या १% |

१)वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दिनांक ३०/०६/२०२१ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०७/०७/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय मोरगाव येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर त्याची पावती मिळेल.२) सदरच्या कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ३०/०६/२०२१ ते ०७/०७/२०२१ सायंकाळी ५ वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालय मोरगाव येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३)मोहरबंद निविदा शक्य झाल्यास दिनांक ०८/०७/२०२१ ला ग्रामपंचायत मोरगाव येथे दुपारी ११.०० वाजे उघडण्यात येतील. ४) सदर कामांची तपशीलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायत च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**दिपक एच.फुले**
ग्रामसेवक
ग्रामपंचायत मोरगांव

**सौ.विजया स.ऊईके**
सरपंच
ग्रामपंचायत मोरगांव

# उघड्यावर धान खरेदी होणार नाही याचे नियोजन करा-ना.मलिक



**■ धान खरेदी मुदतवाढीसाठी प्रस्ताव पाठवा**
**■ जिल्हा कोविड मुक्तीच्या मार्गावर**

**गोंदिया :** धानाचे उत्पादन लक्षात घेता साठवणुकीसाठी गोदाम कमी पाडतात. त्यामुळे धानाचे नुकसान होते. भविष्यात उघड्यावर धान खरेदी होणार नाही यादृष्टीने वखार महामंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन गोदाम निर्मितीचा प्रस्ताव शासनाला सादर करावा, अशा सूचना पालकमंत्री नवाब मलिक यांनी प्रशासनाला दिल्या.

२५ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी राजेश खवले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे, जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे व विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

धान उत्पादन व साठवणूक या बाबी परस्पर पूरक असून उत्पादन पूरक गोदाम असणे आवश्यक आहे. भविष्यात ही अडचण होऊ नये म्हणून आतापासूनच नियोजन करावे व तसा प्रस्ताव पाठवावा असे पालकमंत्री म्हणाले.

धान व मका खरेदीसाठी १५ दिवसांची मुदतवाढ मिळाली तर नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण धान खरेदी होऊ शकते अशी माहिती यावेळी बैठकीत दिली असता, तातडीने प्रस्ताव पाठवावा असे निर्देश त्यांनी दिले. भरडाई बाबतीतही यावेळी आढावा घेण्यात आला.

वीज देयक प्रलंबित असल्यामुळे ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला अथवा नोटीस आली अशा योजनांची देयक १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून तातडीने भरावी. याबाबत वीज विभागासोबत समन्वय साधून पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा खंडित होणार नाही तसेच पूर्ववत केला जाईल यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

जिल्ह्याला ३०० कोटींचे पीक कर्ज उद्दिष्ट असून आतापर्यंत १०८ कोटी रुपये पीक कर्ज वाटप करण्यात आले. राष्ट्रीयकृत बँकांचे उद्दिष्ट कमी असून पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या बँकांमधील शासनाच्या ठेवी काढून घेण्याचा ईशारा पालकमंत्र्यांनी दिला.

यावर्षी २ लाख हेक्टर खरिपाचे असून १० हजार हेक्टरवर भाताच्या रोपवाटिका टाकण्यात आल्या आहेत. आता पाऊस सुरू झाला आहे. खत आणि बियाण्यांचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

कोविड नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासनाने उत्तम नियोजन केले आहे. आज गोंदिया जिल्ह्याचा साप्ताहिक पॉझिटिव्हीटी रेट राज्यात सर्वात कमी आहे. केवळ ४५ क्रियाशील रुग्ण असून त्यापैकी ८ रुग्ण रुग्णालयात उपचार घेत आहेत. ७ रुग्ण ऑक्सिजनवर तर १ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहे. गोंदिया जिल्ह्याची कोरोनामुक्तीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. यासाठी त्यांनी जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या प्रयत्नांची प्रसंशा केली. जिल्ह्यात ६० वर्षावरील ८३ टक्के, ४५ वर्षावरील ५२ टक्के व १८ वर्षावरील ०५ टक्के नागरिकांचे लसीकरण झाले आहे. कालच ३० हजार डोज प्राप्त झाले असून यामुळे लसीकरणाला वेग प्राप्त होणार आहे असे त्यांनी सांगितले.

या बैठकीत कोविडसह, धान खरेदी, पीक कर्ज, पीक विमा, कायदा व सुव्यवस्था, बोनस, सीसीटीव्ही यंत्रणा अद्यावत करणे आदी विविध विषयांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी पालकमंत्री नवाब मलिक यांच्या हस्ते लेखाधिकारी सुशिल जक्कुलवार, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी शलाका सुर्यवंशी, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास) पुजा पाटील व जिल्हा धान्य खरेदी अधिकारी लिना फडके यांचा कोरोना योध्दा म्हणून सत्कार करण्यात आला.

# ६७५ पांदण रस्त्यांचा मार्ग मोकळा



**गोंदिया:** ग्रामीण भागातील ६७५ पांदण रस्त्यांच्या गिट्टी आणि मुरूमाच्या कामे रखडली होती. आमदार विनोद अग्रवाल यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करुन बांधकामांचा मार्ग मोकळा करुन दिला. शुन्य रॉयल्टी पद्धतीने बांधकाम करण्यात येणार असून त्याकरिता २५ कोटी रुपयांचा निधी देखील मिळणार आहे.

ग्रामीण भागात शेतात जाण्याकरिता पांदण रस्ते आहेत. त्या रस्त्यांवर काही वर्षांपुर्वी माती टाकण्यात आली होती. त्यानंतर गिट्टी आणि मुरूम टाकण्यात आले नाही. परिणामी चिखलाने ते रस्ते माखले आहेत. रस्त्यावरुन ये-जा करण्याकरिता तारेवरची कसरत करावी लागत आहे. या रस्त्यांवर गिट्टी आणि मुरूम टाकण्यात यावे, अशी मागणी अनेकदा करण्यात आली. परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. सरपंच संघटनेच्यावतीने आमदार विनोद अग्रवाल यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला. यावर आमदार अग्रवाल यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची भेट घेऊन अडचण समजून घेतली. त्यातून मार्ग काढत ६७५ पांदण रस्त्यांचे खडीकरण आणि मुरूम टाकण्याचा प्रस्ताव पूर्णत्वास नेला. शून्य रॉयल्टीतून बांधकाम होणार असून त्याकरिता २५ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. पांदण रस्त्यांचे बांधकाम पूर्ण झाल्यास शेतकऱ्यांची मोठी अडचण दूर होणार आहे.

## आ.अग्रवालांच्या पुढाकाराने धान खरेदीचा मार्ग मोकळा

**गोंदिया:** आभासी सात-बारा न झालेल्या सात गावांतील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, शासनाच्या आदेशान्वये त्यांचा धानखरेदीचा मार्ग मोकळा झाला आहे. याकरिता आमदार विनोद अग्रवाल यांनी पुढाकार घेतला होता.

गोंदिया शहराजवळील सात गावांमधील शेतकऱ्यांचा सात बारा आभासी न झाल्यामुळे त्यांना धानाची विक्री कुठे करायची? असा प्रश्न पडला होता. शासनाने धान खरेदी न केल्यास तुटपुंज्या भावात धानाची विक्री करावी लागणार की काय? यामुळे शेतकरी हवालदिल झाला होता.

या संदर्भात शेतक?यांनी आमदार विनोद अग्रवाल यांची भेट घेऊन धान विक्रीचा तिढा सोडवण्याची विनंती केली होती. शासन निर्णयाप्रमाणे ज्या शेतकऱ्यांचा सात-बारा पोर्टलवर आभासी नोंदवल्या गेला नव्हता, त्यांचे धान खरेदी करण्यात येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले होते.

मात्र आमदार विनोद अग्रवाल यांनी शासनाकडे पाठपुरावा करत मुंबई येथे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सचिव विलास पाटील तसेच सहसचिवांची भेट घेत सात गावांमधील सात-बारा आभासी न झालेल्या शेतकऱ्यांचे धान खरेदी करण्याबाबत विनंती केली होती. त्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयाने संगणकीकरण सात-बारा न झालेल्या सात गावांचा धान खरेदीचा मार्ग मोकळा झाला आहे.

## सरपंच सेवासंघाचे आ.कोरोटे व उपकार्यकारी अभियंता यांना निवेदन



**देवरी :** थकीत बिलापोटी विद्युत वितरण कंपनीच्या वतीने ग्राम पंचायतीतील स्ट्रीट लाईटचा विज पुरवठा खंडीत करण्यात आला होता. या प्रकारामुळे अनेक ग्राम पंचायतीत रात्रीला काळोख पसरला आहे. या बाबीची दखल घेत सरपंच सेवा संघाच्या वतीने आ.सहषराम कोरोटे व महावितरणचे उपविभागीय अभियंता यांना निवेदन देवून बिलाचा भरणा करून स्ट्रिट लाईची विज पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे.

देवरी तालुक्यातील सर्व ग्रा.पं.च्या हद्दीतील पथदिव्याचे विज कनेक्शन कापण्यात आले आहे. त्यामुळे गावकऱ्यांच्या रोषाला सरपंच, उपसरपंच व सदस्यांना समोर जावे लागत आहे. ग्राम पंचायतींच्या स्ट्रिट लाईटच्या बिलाची थकबाकी जि.प.कडून थकविण्यात आली आहे. विज वितरण कंपनीचे ग्रा.पं.स्तरावर विज जोड.नी बाबदचा करार हा गोंदिया जि.प.शी झाला आहे. यात फक्त मेंटेनंस करण्याची जबाबदारी ही ग्राम पंचायतकडे. आहे. आजच्या तारखेत तालुक्यातील प्रत्येक ग्रा.पं.ला विज वितरण कंपनीचे जवळपास दोन ते पाच लाखापर्यतचे विज बिल भरण्याचे मागणी पत्र प्राप्त झाले आहे. यात जर सुरूवातीपासून विज बिल भरण्याची जबाबदारी ही ग्रामपंचायतला दिली असती तर ऐवढा खर्च ग्रा.पं. वर पडला नसता. आता कोरोना काळात ग्रा.पं.ने कोणत्या फंडातुन विज बिलाचा भरना करावा? असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विज बिलाचा भरणा करून गावातील खंडीत विज पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या विषयी त्वरित निर्णय न झाल्यास तालुक्यातील सर्व सरपंच व उपसरपंच सरपंच सेवा संघाच्या नेतृत्वात तीव्र आंदोलन करणार, असा इशारा ही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदन देताना शिष्टमंडळात सरपंच सेवा संघाचे तालुकाध्यक्ष विनोद भेंडारकर, संजय राऊत, कृपासागर गोपाले, रेखा तरोने, मनोहर राउत, सरपंच नितेश भेण्डारकर, सोनू नेताम, धनश्री गंगासागर, गरीबा टेम्भूरकर, गुणवंता कवास, मीराबाई कुंजाम, कल्पना गोस्वामी, माधुरीताई राउत, भारती सलामे, शामकला गावळ यांच्यासह तालुक्यातील अनेक सरपंच व उपसरपंच उपस्थित होते.

# तंटामुक्त समितीने लावले प्रेमीयुगलांचे लग्न



**चिचगड :-** चिचगड पासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या वांढरा येथे रविवारला तंटामुक्त समितीने दोन मुला मुलींचे आंतरजातीय लग्न लावून दिले. मुलीचे नाव सुलभा तुळशीदास वालदे राहणार रेहडी मुलगा प्रकाश रोशन गिरी राहणार ककोडी या दोघांमध्ये प्रेम संबंध होते. दोघांची जात वेगळी असल्यामुळे सुरुवातीला दोन्ही पक्षाकडून विरोध होता.

गावात असलेल्या तंटामुक्ती समितीने दोघांच्या आई-वडिलांना आणि नातेवाईकांना समजावून त्या दोघांचे पांढरा ग्रामपंचायत परिसरामध्ये लग्न लावून दिले. यावेळी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष भोजसिंग कच्छप,सचिव अशोक शहारे, पोलीस पाटील वाढंरा सदस्य मोतीलाल पीहिदे, इंदल अरकरा, महादेव श्याम कुवर,भिवाजी भोयर, तानबाजी नाटके, ललित भैसारे, साईन सैय्यद, रिंकेश कटकवार इत्यादी आणि गावकरी ह्या लग्न सोहळ्यात उपस्थित होते.

यावेळी ग्रामपंचायत वाढंरा आणि तंटामुक्ती समितीने दोन्ही नवदाम्पत्याला जीवनोपयोगी भेटवस्तू दिले. यावेळी उपस्थित गावकऱ्यांनी मुला मुलींना भेट म्हणून दोन हजार चाळीस रुपये दिले.

# इंटरसिटी, शिवनाथ एक्सप्रेसचे पुनरागमन, ४ जुलैपासून संचालन



**गोंदिया:** कोरोनाच्या संक्रमणामुळे गत वर्षीच्या मार्च महिन्यापासून रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले आहे. आता कोरोनाचे संक्रमण नियंत्रणात आहे. बाधितांच्या संख्येत घट होत आहे. यामुळे रेल्वेची विस्कटलेली स्थिती पुर्वपदावर येऊ लागली आहे. प्रवाशांची मागणी व प्रवाशांना सोयी सुविधा उपलब्ध करून देता यावी यासाठी रेल्वे प्रशासनाकडून रेल्वेगाड्यांच्या संचालनाला हिरवा कंदील दाखवण्यात येत आहे. येत्या ४ जुलैपासून इतवारी-बिलासपूर इंटरसिटी व शिवनाथ एक्सप्रेस पुन्हा धावणार आहे.

नागपूर ते रायपूर दरम्यान प्रवास करणाऱ्यांसाठी इंटरसिटी एक्सप्रेस महत्त्वाची मानली जाते. कोरोना संसर्गामुळे ही रेल्वेगाडी बंद करण्यात आली होती. गाडी क्रमांक ०८२५७ व ०८२५८ इंटरसिंटी सुपरफास्ट एक्सप्रेस ४ जुलैपासून दररोज धावणार आहे. गाडी क्रमांक ०८२५७ ही रेल्वगाडी दुपारी ३.५० वाजता बिलासपूर येथून सुटेल. ती इतवारी रेल्वेस्थानकावर रात्री ११.५५ वाजता पोहचेल. गाडी क्रमांक ०८२५८ ही इतवारीवरुन सकाळी ६.१५ वाजता सुटेल. बिलासपूर स्थानकावर दुपारी १.२० वाजता पोहचेल. त्याचबरबर गाडी क्रमांक ०८२३९ गेवरारोड इतवारी पॅसेंजर ही गेवरारोड स्थानकावरून सायंकाळी ६ वाजून ५ मिनिटांनी सुटेल. गोंदिया स्थानकावर रात्री १ वाजून ५५ मिनिटांनी पोहचेल तर पहाटे ४.३० वाजता इतवारी स्थानक गाठेल.

परतीच्या प्रवासात या रेल्वेगाडीचे क्रमांक बदलविण्यात येणार असून गाडी क्रमांक ८२४० शिवनाथ एक्सप्रेस म्हणून ही रेल्वेगाडी रात्री ११.५५ वाजता इतवारी रेल्वेस्थानकावरून दरदिवशी सोडण्यात येईल. या रेल्वेगाडीचे गोंदिया स्थानकावर रात्री १.५३ वाजता आगमन होणार असून सकाळी ७ वाजता बिलासपूर रेल्वेस्थाकावर पोहचणार आहे. विशेष म्हणजे, या दोन्ही रेल्वेगाड्या पुन्हा सुरू करण्यात आल्याने या मार्गावरील प्रवाशांना सोयीचे झाले असल्याने प्रवाश्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# गणनेत महाराष्ट्रात ४१ तर मध्यप्रदेशात ४७ सारस आढळले



**गोंदिया:** जून महिन्यात करण्यात आलेल्या सारस गणनेत महाराष्ट्रात ४१पक्षी आढळले आहेत. गोंदिया जिल्ह्यात ३९, भंडारा ०२ तर मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात ही संख्या ४७ इतकी आहे. सेवा संस्थेतर्फे मागील सात-आठ वर्षांपासून सारस पक्ष्यांच्या संवर्धनासाठी विशेष उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचा परिणाम यानिमित्ताने दिसून आला असून मागील वर्षीच्या तुलनेत सारस पक्ष्यांची संख्या कमी झाली आहे.

महाराष्ट्रातील गोंदिया आणि मध्य प्रदेशातील बालाघाट हे जिल्हे सारस पक्ष्यांच्या संवर्धनासाठी महत्वपूर्ण ठरले आहेत. वैनगंगा, वाघ नदीचा किनाऱ्यावर सारस दिसून येत असून पर्यटकांसाठी संधी उपलब्ध झाली आहे. बालाघाट जिल्ह्यातील १८ चमूच्या माध्यमातून व गोंदिया-भंडारा जिल्ह्यात १३ ते १९ जून रोजी २३ चमूच्या माध्यमातून ही गणना करण्यात आली.

पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षण आणि संवर्धन यासाठी सातत्याने कार्यरत "सेवा" संस्था (Sustaining Environment and Wildlife Assemblage) द्वारा "सेवा" संस्थेचे अध्यक्ष आणि सारस संवर्धन प्रकल्पाचे प्रभारी सेवा संस्थेचे सदस्य श्री. सावन बाहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सारस गणनेचे काम पारंपारिक आणि शास्त्रीय पद्धतीने केले गेले. सात दिवसांच्या सारस गणना दरम्यान, गोंदिया आणि बालाघाट जिल्ह्यातील एकूण ७० आणि ८० ठिकाणी सेवा संस्थेचे सदस्य, स्थानिक शेतकरी, सारस मित्र आणि वनविभाग गोंदिया व बालाघाट यांच्या कर्मचाऱ्यांनी सारस गणना केली.

वर्षभर, संस्थेचे सदस्य सारसच्या आरामाची जागा, पुनरुत्पादन अधिवास आणि अन्नासाठी वापरल्या जाणाऱ्या भ्रमण मार्गाचा सराव करतात, तसेच सारसच्या अधिवास असलेल्या ठिकाणी किवा त्यांच्या सभोवताल राहणाऱ्या शेतकरयाना सारस पक्षाचे महत्व पटवून देत सारस पक्षाच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी प्रवृत्त करतात. आवारातील शाळेत जाऊन पर्यावरण तसेच सारस संरक्षण व संवर्धन यावर कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना सारस संरक्षण मोहिमेमध्ये जोडला जातो.

बाघ आणि वैनगंगा नद्या महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातील गोंदिया आणि बालाघाट जिल्ह्याला विभागतात. भौगोलिक दृष्टीकोनातून, नदीच्या दोन्ही बाजूंच्या प्रदेशाच्या जैवविविधतेमध्ये बरेच साम्य आहे. म्हणून, काही सारस पक्ष्यांच्या जोड्या अधिवास आणि अन्नासाठी दोन्ही प्रदेशांमध्ये समान प्रमाणात फिरताना आढळतात. दिनांक १३/०६/२०२१ ला गोंदिया जिल्ह्यात एकूण २३ गट ( टिम ) द्वारे ७०-८० ठिकाणी सकाळी ५.०० वाजे जाऊन प्रत्येक ठिकाणी वनविभागाच्या कर्मचाऱ्यानसोबत गणना करण्यात आली. आकडेवारीची विश्वसनीयता आणि सारस पक्ष्यांची उपस्थिती यावर शंका नको म्हणून दिनांक १३/०६/२०२१ ते १९/०६/२०२१ पर्यंत सारस पक्ष्यांच्या अधिवास असलेल्या ठिकाणी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. ज्यामध्ये शेतात, तलावात, नद्यांमध्ये जाऊन स्थानिक लोकांशी संवाद साधण्यात आला. दिनांक १२/०६/२०२१ रोजी प्रकल्प प्रभारी अविजित परिहार यांच्या मार्गदर्शनाखाली बालाघाट जिल्ह्यातील ६० ते ७० ठिकाणी १८ गट (टिम) द्वारे गणना करण्यात आली.

सारस गणनेच्या संपूर्ण मोहिमेमध्ये उप वनसंरक्षक कुलराजसिंग वनविभाग गोंदिया व दक्षिण वनविभाग बालाघाटचे मंडल अधिकारी जी.के. वरकडे यांचे अनमोल मार्गदर्शन व सहकार्य लाभले. सोबच वनविभागचे वनपरिक्षेत्र अधिकारी हड्डा गोविंद मरावी, वनपरिक्षेत्र अधिकारी गोंदिया सुशिल नादवटे, वनपरिक्षेत्र अधिकारी तिरोडा शेषराव आकरे आणि समस्त वनकर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. सेवा संस्थेच्या सर्व सदस्यांनी गणनेला यशस्वी करण्यासाठी अथक प्रयत्न केले.

## डॉ.परिणय फुके यांच्याकडे केली अडीच कोटी विकास निधीची मागणी



**अर्जुनी-मोरगाव :** स्थानिक नगरपंचायतच्या नगरसेवकांचा कार्यकाल संपलेला असून सध्या प्रशासकराज सुरु आहे. तरीही विकास कामांची जिद्द आणि चिकाटी असलेले येथील नगरपंचायतच्या प्रभाग-१० चे माजी नगरसेवक तथा भाजप गटनेते देवेंद्र टेंभरे यांनी शहरातील अन्य प्रभागाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून रस्ते, नालीबांधकाम, बंद गटारे व अन्य विकास कामांसाठी भंडारा-गोंदिया विधान परिषदेचे आमदार डॉ.परिणय फुके यांच्याकडे अडीच कोटी रुपये विकास निधीची मागणी केली आहे. तसा आराखडा त्यांनी तयार केला असून आपण शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबध्द असल्याचे माजी नगरसेवक देवेंद्र टेंभरे यांनी सांगितले.

नगरसेवक तथा भाजपा गटनेते देवेंद्र टेंभरे हे मागील पंचवार्षिकमध्ये प्रभाग दहा मधून निवडून आले होते. प्रभागातील मतदारांनी दाखविलेल्या विश्वासावर खरे उतरुन त्यांनी आपल्या प्रभागात स्वकर्तृत्वातून निधी आणून तब्बल तीन कोटींचे विकास कामे केली व प्रभागाचा कायापालट केला. मजबूत रस्ते, सुसज्ज बंद गटारे, नाल्या, पाणी व विजेची परिपूर्ण सोय त्यांनी केली. गेल्या सहा महिन्यापूवी नगरपंचायतच्या नगरसेवकांचा कार्यकाल संपलेला आहे. सध्या प्रशासकराज सुरु आहे. त्यामुळे शहर विकासाची गती मंदावली आहे.आपल्या प्रभागासोबतच शहरातील इतर प्रभागाचा विकास व्हावा म्हणून त्यांनी प्रभाग सहा, नऊ, दहा, बारा व पंधरा या प्रभागातील विकास कामांचा कृती आराखडा तयार केला. यामध्ये मजबूत रस्ते, नाल्या, बंद गटारे व खुल्या जागेत बागबगीचे व उद्यान यासारख्या विकास कामांचा समावेश करुन कृती आराखडा तयार केला. यासाठी लागणारा संभावित अडीच कोटीचा निधी प्राप्त करण्यासाठी त्यांनी भंडारा-गोंदिया विधान परिषदेचे आमदार डॉ.परिणय फुके यांच्याकडे आराखडा सादर केला. हा विकास निधी आपण मिळवून देवू, असे आश्वासन आमदार डॉ.परिणय फुके यांनी दिल्याचे माजी नगरसेवक टेंभरे यांनी सांगितले.

# आरक्षणासाठी आरक्षण हक्क कृती समितीचे निवेदन



## शेतकरी विरोधी कायदे रद्द करा

**नवीन शैक्षणिक धोरणात मागासवर्गीयांना नवीन शैक्षणिक धोरणात व खासगी विद्यापीठात फ्रीशीप लागू करावी, सरकारी कंपन्या, बँक, विभागाचे खासगीकरण बंद करावे, नोकरीतील बॅकलॉग भरण्यासाठी भरती प्रक्रिया सुरू करावी. मागासवर्गीयांवरील अत्याचार प्रकरणाचा निर्वाळा करण्यासाठी तालुकास्तरावर न्यायालय तयार करण्यात यावे. मंत्रीगट समितीच्या २००६च्या शिफारसीप्रमाणे ओबीसी प्रवर्गाला पदोन्नतीत आरक्षण लागू करावे, शेतकरी विरोधी तीन कायदे रद्द करण्यात यावे.**

**गोंदिया:** मागासवर्गीय समाजाला सामाजिक न्याय मिळवून देण्याकरिता संविधानात आरक्षणाची तरतूद करण्यात आली. मात्र त्या आरक्षणाशी छेडछाड करण्यात येत आहे. वंचित घटकांना न्यायापासून दूर ठेवण्याचे षडयंत्र करण्यात येत आहे. या प्रकाराच्या विरोधात आरक्षण हक्क कृती समितीतर्फे शनिवारी आक्रोश आंदोलन करुन उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत राष्ट्रपती आणि राज्यपाल यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले की २० मे २०२१ रोजी संपूर्ण राज्यात आक्रोश आंदोलन करुन निवेदन देण्यात आले. त्याची दखल घेण्यात आली नाही. आरक्षणासंदर्भात लोकप्रतिनिधी, नेते आणि समाजघटकांची बैठक आयोजित करण्यासंदर्भातील मागणी देखील मान्य झाली नाही. १६ जून २०२१ च्या पत्राची देखील दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे हे आंदोलन करण्यात येत आहे.

७ जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये रद्द केलेले ३३ टक्के आरक्षण सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून कायम करण्यात यावे, मागासगर्वीयांची पदोन्नती रद्द करण्यासंदर्भातील निर्णय घेणाऱ्या मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा. मंत्रीगट समितीचे अध्यक्ष अजीत पवार यांनी मागासवर्गीयांच्या विरोधात निर्णय घेतले. त्यांनी पदावरुन बरखास्त करण्यात यावे, देशातील कामगार हितांचे ४४ कायदे रद्द करुन चार काळे कायदे मंजूर करण्यात आले. ते कायदे रद्द करुन हिताचे ४४ कायदे पुन्हा लागू करावे, परदेशी शिष्यवृत्तीची संख्या कर्नाटक राज्याप्रमाणे ४५० पेक्षा अधिक करण्यात यावी. परदेशी शिष्यवृत्तीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता डॉलरच्या दरात देण्यात यावा.

निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात अतुल सतदेवे, अनील वट्टी, डी.एस.मेश्राम, कैलाश भेलावे, शिव नागपुरे, खेमेंद्र कटरे, रमेश ब्राम्हणकर, दिलीपकुमार मेश्राम, सुनील भोंगाडे, रवी भांडारकर, भुमेश शेंडे, एस.यू.वंजारी, संगीता पुसाम, सावन कटरे, विनायक येडेवार, डॉ.जी.ए.येडेवार, महेंद्र बिसेन, डॉ.एन.डी. किरसान, सविता बेदरकर आदिंचा समावेश होता.

## दोन चोरट्यांसह ३.१५ लाखांचा मुद्येमाल ताब्यात



**गोंदिया:** शहरातील हेमू कॉलनी येथे घरफोडी करुन ३ लाख १५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने रोख चोरी करणाऱ्या दोन आरोपींना शहर पोलिसांनी अटक केली. बबन भागडकर व सुनिल गेंडरे अशी आरोपींची नावे असून त्यांच्याकडून चोरी केलेला मुद्येमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

हेमू कॉलनी येथील कन्हय्यालाल चंदवानी हे २४ जून रोजी रात्री शहराबाहेरील एका सभागृहात लग्नासाठी सहकुटूंब गेले होते. ही संधी साधून बबन भागडकर (२४, रा.मरारटोली) व सुनिल गेंडरे (२०, रा.झोपडी मोहल्ला) यांनी घरफोडी करुन १ लाख ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व ९५ हजार रुपये रोख असा एकूण ३ लाख १५ हजार रुपयांचा मुद्येमाल चोरी केला. याप्रकरणी चंदवानी यांनी शहर पोलिसात तक्रार दाखल केली होती.

दरम्यान पोलिसांना चौकशीत आरोपींना अटक केली असता त्यांनी आपला गुन्हा कबूल केला. पोलिसांनी त्यांच्याकडून मुद्येमाल जप्त केला असून गुन्हा दाखल केला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक महेश बनसोडे, सहायक पोलिस निरीक्षक अभिजीत भुजबळ, सपोनि सागर पाटील, पोना जागेश्वर उईकके, सुबोधकुमर बिसेन, सतीश शेंडे, ओमेश्वर मेश्रम, संतोष बोपचे, प्रमोद चव्हाण, योगेश बिसेन, दीपक रहांगडाले, छगन विठ्ठले, विकास वेदक, शहारे यांनी केली.